**सहमती घोषणापत्र**

प्रेषक:
कर्जदाराचे नाव:

Borrower Address:
कर्जदाराचा पत्ता

सह कर्जदार 1 चे नाव
सह कर्जदार 1 चा पत्ता:

सह कर्जदार 2 चे नाव
सह कर्जदार 2 चा पत्ता:

सह कर्जदार 3 चे नाव
सह कर्जदार 3 चा पत्ता:

सह कर्जदार 4 चे नाव
सह कर्जदार 4 चा पत्ता:

सह कर्जदार 5 चे नाव
सह कर्जदार 5 चा पत्ता:

गॅरेंटरचे नाव:

गॅरेंटरचा पत्ता:

प्रति:

चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी क. लि.
'चोला क्रेस्ट', सी- 54 आणि 55, सुपर बी- 4,
थिरू वि का इंडस्ट्रियल इस्टेट,
गिंडी,
चेन्नै- 600032.

सीआयएन: L65993TN1978PLC007576.

सह कर्जदार 5 चा पत्ता: पहिला एसटी, एस1, बालाजी नगर,
इयापंथांगल, चेन्नै, तमिळ नाडू- 600056

महोदय

संदर्भ: अर्ज क्र.

1. मी/आम्ही घोषित करतो की, कर्ज घेण्यासाठी मी/आमच्याद्वारे सादर करण्यात आलेली/येणारी माहिती व कागदपत्रे माझ्या/आमच्या सर्वोत्तम माहितीनुसार व विश्वासानुसार खरी व योग्य असतील व त्यामध्ये काही बदल झाल्यास ते आपल्याला तत्काळ कळवण्याची जवाबदारी मी/आम्ही घेतो. मला जाणीव आहे की, इथे दिलेली व इलेक्ट्रॉनिक प्रकारे अपलोड केलेली माहिती व कागदपत्रे सीआयएफएसएल कर्मचारी किंवा त्यांच्या एजंटसच्या सहाय्याने देण्यात आली आहे.

2. जर मी/आम्ही दिलेली कोणतीही माहिती किंवा तपशील असत्य किंवा दिशाभूल करणारी किंवा चुकीची आढळली, तर मला/आम्हांला कल्पना आहे की, मी/आम्ही त्यासाठी जवाबदार ठरले जाऊ शकतो. सर्व तपशील, माहिती व कागदपत्रे क्रेडीट मान्यतेच्या किंवा अन्य कोणत्याही उद्देशाने ठेवण्यासाठी/शेअर करण्यासाठी मी/आम्ही चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड (सीआयएफसीएल) व तिचे सहकारी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला अधिकृत करत आहोत.

3. माझ्या/आमच्या व्यक्तिगत माहितीची पडताळणी करण्यासाठी, गुणवत्ता चाचण्या करण्यासाठी, नियामक/बंधनकारक आवश्यकतांचे पालन करण्यासाठी व अन्य कर्ज देण्याशी संबंधित कामांसाठी मी/आम्ही व सीआयएफसीएलचे कर्मचारी ह्यांच्यातील टेलि- संभाषण/व्हॉईस कॉल रेकॉर्ड करून जतन करण्यासाठी मी/आम्ही चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड (सीआयएफसीएल) व तिचे टेलि- कॉलिंग सेवा प्रदाते ह्यांना अधिकृत करत आहोत. मला/आम्हांला जाणीव आहे की, ह्या रेकॉर्डिंगमध्ये माझी/आमची व्यक्तिगत माहिती/डेटा जसे नाव, पत्ता, जन्मदिनांक, पॅन, रोजगाराची, उत्पन्न व कर्जासंबंधीची माहिती असू शकते.

4. मी/आम्ही घोषित करतो की, कोणताही अधिनियम, नियम, नियमन किंवा अन्य कोणताही कायदा किंवा विधी किंवा कोणत्याही सरकारी किंवा बंधनकारक यंत्रणेने वेळोवेळी जारी केलेली कोणतीही अधिसूचना/निर्देश ह्यांचे उल्लंघन करून मी/आम्ही हा अर्ज करत नाही आहोत. मला/आम्हांला योग्य जाणीव आहे की, माझ्या/आमच्या कर्जाला मान्यता देणे किंवा ते फेटाळणे हा सीआयएफसीएलचा संपूर्णपणे स्वत:चा निर्णय असेल. मी/आम्ही निवेदन करतो की, हा निधी वर दिलेल्या उद्देशासाठीच वापरला जाईल व कोणत्याही बेकायदेशीर, अनुचित किंवा समाज घातक उद्देशासाठी वापरला जाणार नाही. माझ्या/आमच्याविरोधात कोणत्याही इनसॉल्व्हन्सीबद्दल (दिवाळखोरी) कोणतीही प्रक्रिया किंवा थकित ड्युजच्या रिकव्हरीसाठी दावा दाखल केला गेलेला नाही किंवा प्रलंबित नाही आहे हे मी/आम्ही प्रमाणित करतो.

5. मी/आम्ही प्रमाणित करतो की, माझे/आमचे कौटुंबिक आर्थिक उत्पन्न म्हणजेच माझ्या/आमच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (पती, पत्नी आणि अविवाहित मुले) हे तीन (3) लाख रूपयांहून अधिक आहे आणि म्हणून, ह्या सुविधेमधील माझे/आमचे कर्ज हे मायक्रोफायनान्स कर्ज म्हणून बघितले जाऊ शकत नाही.

6. मी/आम्ही घेत असलेल्या कर्जावर वेळोवेळी लागू असलेले शुल्क व फीस ह्याबद्दल मी/आम्ही वाचले आहे व समजून घेतले आहे. मला/आम्हांला जाणीव आहे की, प्रशासकीय व प्रक्रिया फीस व लागू कर नॉन- रिफंडेबल स्वरूपाचे आहेत व कोणताही व्यवहार रोख रकमेमध्ये करण्यात आलेला नाही. कंपनी अधिनियम, 2013 नुसार मी/आम्ही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रकारे सीआयएफसीएलच्या संचालकांशी संबंधित नाही आहोत आणि आरबीआयच्या केवायसी मार्गदर्शक सूचनांनुसार राजकीय प्रकारे एक्स्पोज झालेले व्यक्ती

नाही आहोत. वेळोवेळी लागू असलेल्या सीआयएफसीएलच्या सर्व नियमांचे मी/आम्ही पालन करू व वरील स्थितीमध्ये कोणताही बदल झाल्यास कंपनीला त्याबद्दल कळवू. सीआयएफसीएलच्या निर्णयावर परिणाम होऊ शकेल अशा प्रकारची कोणतीही माहिती मी/आम्ही लपवणार नाही किंवा लपवली नाही आहे.

7. माझी/आमची ओळख व आमचा पत्ता सीकेवायसीआरच्या डेटाबेसमधून पडताळण्याच्या उद्देशानेच मी/आम्ही सेंट्रल केवायसी रजिस्ट्री (सीकेवायसीआर) मधून माझे/आमचे केवायसी रेकॉर्डस डाउनलोड करण्यासाठी माझी/आमची सहमती देत आहे. मला/आम्हांला जाणीव आहे की, माझ्या/आमच्या केवायसी नोंदीमध्ये माझे/आमचे नाव, पत्ता, जन्म दिनांक, पॅन क्रमांक इ. माझी/आमची व्यक्तिगत माहिती आहे. तसेच मी/आम्ही इथे आपल्याला दिलेल्या नंबरवर/ईमेल एड्रेसवर सीकेवायसीआरद्वारे एसएमएस/ईमेल सूचना प्राप्त करण्यासाठी सहमती देत आहोत.

8. आपल्याला मी/आम्ही आधीच दिलेल्या कोणत्याही केवायसी पुराव्यामध्ये काही बदल झाल्यास मी/आम्ही घोषित करतो की, असा बदल झाल्यानंतर 30 दिवसांच्या आत मी/आम्ही अद्ययावत केवायसीची अपडेट केलेली प्रत आपल्याला सादर करू. तसेच, अर्जदार/सह अर्जदाराच्या लाभाच्या मालकीच्या तपशीलांमध्ये काही बदल झाल्यास तत्काळ तेसुद्धा अंतिम लाभार्थी मालकाच्या (मालकांच्या) केवायसी पुराव्यासोबत अपडेट केले जाईल.

9. माझी/आमची ओळख व पत्त्याचा पुरावा म्हणून मी युआयडीएआय (आधार) द्वारे जारी करण्यात आलेल्या आधार कार्डची/प्रत्यक्ष ई-आधार/मास्क्ड आधारची प्रत स्वेच्छेने सीआयएफसीएलला सादर करत आहोत. मला/आम्हांला जाणीव आहे व समजले आहे की, सीआयएफसीएलने अनुमती दिलेल्या पर्यायांनुसार आधारच्या व्यतिरिक्त अन्य कागदपत्रेसुद्धा ओळख व पत्त्याचा पुरावा म्हणून सादर केली जाऊ शकतात. माझ्याद्वारे/आमच्याद्वारे अर्ज केलेल्या सुविधेला देण्यासाठी आधारची पडताळणी करण्यासाठी मी/आम्ही माझी/आमची स्पष्ट सहमती सीआयएफसीएलला देत आहोत. जर मी/आम्ही पत्ता/ओळख पुरावा म्हणून आधारची एक्सएमएल फाईल दिली, तर सीआयएफसीएल ती डिक्रिप्ट करून स्टोअर करून नोंदींमध्ये ठेवेल व डिक्रिप्ट करण्याच्या उद्देशाने तिस-या पक्षाच्या सेवासुद्धा वापरू शकेल. सीआयएफसीएलने मला/आम्हांला स्पष्ट केले आहे की, सीआयएफसीएलद्वारे त्यांच्या नियमित तपासणीच्या प्रक्रियेचा भाग म्हणून सीआयएफसीएलला आवश्यक असेल त्यानुसार अशा क्रेडीट व क्षेत्रीय पडताळणीच्या उद्देशासाठी आधारवर उपलब्ध असलेली ओळख व पत्ता शेअर केला जाऊ शकतो.

10. आधारद्वारे ई- स्वाक्षरी किंवा अन्य ई- केवायसी सेवांच्या पडताळणीसह माहिती तंत्रज्ञान अधिनियम, 2000 अंतर्गत असलेल्या प्रक्रिया व विश्वसनीयता प्रमाणित करण्याच्या पद्धतींचे पालन करून इलेक्ट्रॉनिक प्रकारे कर्ज संबंधित कागदपत्रांवर स्वाक्षरी करण्यासाठी मी/आम्ही ह्याद्वारे सहमती देत आहोत.

11. आंतर- सरकारी यंत्रणा असलेल्या फायनान्शियल एक्शन टास्क फोर्सद्वारे त्यांच्या सार्वजनिक विधानांमध्ये आर्थिक भ्रष्टाचाराच्या विरोधामधील कमतरता आणि किंवा दहशतवादाच्या आर्थिक बाजूला विरोध करण्यातील कमतरता ह्यासाठी ओळखल्या गेलेल्या व सूचिबद्ध केल्या गेलेल्या क्षेत्रातील व्यक्तींसह माझा/आमचा कोणताही व्यापारी/आर्थिक संबंध/व्यवहार नाही हे मी/आम्ही घोषित करतो.

12. माझ्या/आमच्या कर्ज पात्रतेच्या मूल्याची पडताळणी करण्यासाठी कोणत्याही क्रेडीट माहिती कंपन्यांकडून क्रेडीट अहवाल प्राप्त करण्यासाठी मी/आम्ही ह्याद्वारे सीआयएफसीएलला अधिकृत करत आहोत. मी/आम्ही सहमती देत आहोत की, मी/आम्ही दिलेले संदर्भ संपर्क हे माझ्या/आमच्या ओळखीच्या पडताळणीसाठी, परतफेडीच्या क्षमतेच्या पडताळणीसाठी आणि/किंवा ड्यु दिवशी परतफेड करण्यामध्ये असफल होण्यासह ह्या अर्जातील अटींचे माझ्याद्वारे/आमच्याद्वारे उल्लंघन झाल्यास वसुलीच्या प्रयत्नांसाठी वापरले जाऊ शकतील व त्यांना संपर्क केला जाऊ शकेल. मी/आम्ही सहमत आहोत व मान्य करत आहोत की, सीआयएफसीएल आपल्या स्वयंनिर्णयानुसार स्वत: किंवा अधिकृत व्यक्ती, वकील, एजन्सीज, ब्युरोज इ. द्वारे दिलेली कोणतीही माहिती पडताळेल, क्रेडीट संदर्भ तपासेल, रोजगाराचे तपशील तपासेल व कर्जासाठीची योग्यता वेळोवेळी तपासण्यासाठी क्रेडीट रिपोर्टस प्राप्त करेल. माझ्या/आमच्या व्यवसायाची वैधता तपासण्यासाठी अधिकृत व्यवसाय नोंदणी यंत्रणांकडून माझ्या/आमच्या व्यवसायांचे तपशील प्राप्त करण्यासाठी मी/आम्ही सीआयएफसीएलला अनुमती देत आहोत. मला/आम्हांला जाणीव आहे की, व्यक्तिगत क्रेडीट व जोखीम प्रोफाईल्सनुसार कर्जदारांच्या विभिन्न प्रकारांसाठी व्याज दर वेगळे असतील व व्याज दराचे मॉडेल हे सीआयएफसीएलच्या वेबसाईटवर दिलेले आहे.

13. पुढील संदर्भात संपर्क करण्यासाठी- एसएमएस/ईमेल/सूचना पाठवण्यासाठी व कॉल करण्यासाठी मी/आम्ही आपल्याला अनुमती देत आहोत.

    ○ कर्ज खात्यासंदर्भात कोणत्याही व्यवहाराचे मॅसेजेस (अनिवार्य);

    व्यवहारांच्या व्यतिरिक्त अन्य संपर्काची निवड न करण्यासाठी बॉक्सेसवर टिक करा;

    ☑ कर्ज/सेवांशी किंवा अशा अन्य संबंधित उत्पादनांशी संबंधित कोणतेही कमर्शियल, मार्केटिंग किंवा प्रमोशनल मॅसेजेस

    ☑ जन्म/विवाह दिनाच्या शुभेच्छांसह कोणत्याही दिवसाच्या शुभेच्छा.

    सूचना: सीआयएफसीएलला संपर्क करून अर्जदार व्यवहारांव्यतिरिक्त अन्य संपर्कासाठी दिलेली सहमती बदलू शकतो/मागे घेऊ शकतो.

14. जीवन, आरोग्य, अपघात इ. साठी विमा पॉलिसी सुरक्षा देण्यासाठी व मान्यता मिळाली असेल तर आर्थिक मदत करण्यासाठी मी/आम्ही सीआयएफसीएलला विनंती करतो.

धन्यवाद,

आपले विश्वासू,

ह्यांच्या वतीने

कर्जदाराचे नाव व स्वाक्षरी: सह कर्जदार 1 चे नाव व स्वाक्षरी सह कर्जदार 2 चे नाव व स्वाक्षरी सह कर्जदार 3 चे नाव व स्वाक्षरी

सह कर्जदार 4 चे नाव व स्वाक्षरी सह कर्जदार 5 चे नाव व स्वाक्षरी गॅरेंटर नाव व स्वाक्षरी:

**कर्ज करार- लघु उद्योग कर्ज**

पुढील पक्षांमधील कर्ज कराराच्या (‘**कार्यवाही दिनांक**’) अनुसूचीमध्ये दिलेल्या दिवशी हा कर्ज करार केला जात आहे:

कर्जदार आणि सह- कर्जदार ज्यांचे अधिक स्पष्ट वर्णन ह्यामधील भाग एकमधील अनुसूचीमध्ये दिले गेले आहे (ज्यांना इथून पुढे "कर्जदार" म्हंटले जाईल) व गॅरेंटर/गॅरेंटर्स ज्यांचे अधिक स्पष्ट वर्णन ह्यामधील अनुसूचीमध्ये दिले गेले आहे (ज्यांना इथून पुढे "गॅरेंटर" म्हंटले जाईल) व संदर्भ किंवा अर्थ वेगळा असल्याशिवाय ह्या शब्दांच्या अर्थामध्ये त्यांचे/तिचे संबंधित वारस, कार्यवाहक, प्रशासक, नाम निर्देशित व्यक्ती, मुखत्यार पत्र धारक व कायदेशीर प्रतिनिधी ह्यांचा समावेश असल्याचे मानले जाईल (जेव्हा कर्जदार/गॅरेंटर व्यक्ती/एकमेवर प्रोप्रायटर असेल), हितसंबंधांचे वारस त्या त्या स्थितीनुसार (जिथे कर्जदार/गॅरेंटर कंपनी अधिनियम, 2013 नुसार एक कंपनी किंवा अन्य कोणतीही कॉरपोरेट बॉडी असेल), फर्मचे वेळोवेळी असलेले भागीदार, त्यांचे वारस व सर्व्हायव्हर्स, कार्यवाहक, प्रशासक, कायदेशीर प्रतिनिधी, नाम निर्देशित व्यक्ती आणि भागीदारांचे वारस (जेव्हा कर्जदार/गॅरेंटर एक भागीदारी तत्त्वावरील फर्म असेल),

आणि

चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी क. लि. ही कंपनी अधिनियम, 1956 नुसार स्थापन झालेली व नोंदणीकृत कंपनी आहे व तिचे नोंदणीकृत कार्यालय 'चोला क्रेस्ट', सी- 54 आणि 55, सुपर बी- 4, थिरू वि का इंडस्ट्रियल इस्टेट, गिंडी, चेन्नै- 600032 येथे आहे (इथून पुढे तिला "कंपनी" म्हंटले जाईल) व ह्याद्वारे संदर्भ किंवा अर्थ अन्य अपेक्षित असल्याशिवाय त्यामध्ये कंपनीचे वारस व नियुक्त व्यक्ती असतील अन्य भाग

कर्जदार, गॅरेंटर्स आणि कंपनी यांना एकत्रित प्रकारे "पक्ष" आणि स्वतंत्रपणे वेगळे "पक्ष" म्हणून संबोधले जाईल.

त्याशिवाय:

A. इतर बाबींशिवाय कंपनी विविध ग्राहकांना कर्ज/आर्थिक सुविधा देण्याच्या उद्योगामध्ये सहभागी आहे;

B. कर्ज अर्ज व खालील अनुसूचीमध्ये अधिक विस्ताराने दिलेल्या उद्देशासाठी कर्जदाराने आर्थिक मदतीची विनंती कंपनीला केली होती;

C. गॅरेंटरने कंपनीला वरील आर्थिक सुविधा कर्जदाराला देण्याची विनंती केली होती व त्यावर विचार करून गॅरेंटरने कंपनीला कर्जदाराच्या येथे दिलेल्या करारातील अटी व शर्तींच्या योग्य पालनाची व ह्या कर्ज करारामध्ये निर्धारित केलेल्या सर्व दायित्वांची पूर्तता करण्याची हमी देण्याची तयारी दर्शवली;

D. कर्जदार आणि गॅरेंटरने दिलेल्या निवेदनावर विसंबून कंपनीने येथे दिलेल्या अटी व शर्तीसह कर्जदाराला अपेक्षित असलेले कर्ज देण्याची सहमती दिली आहे.

**आता, ह्याकर्ज करारामध्ये पुढील बाबी अंतर्भूत आहेत:**

1. **व्याख्या आणि विश्लेषणे**

ह्या कर्ज करारामध्ये विषय किंवा संदर्भामध्ये अन्यथा अभिप्रेत असल्याशिवाय खाली दिलेल्या शब्दांचे अर्थ पुढील प्रमाणे असतील. येथे व्याख्या न केलेल्या संकल्पना व शब्द ह्यांचे अर्थ हे सामान्य विधाने अधिनियम, 1897 मध्ये दिलेल्या संकल्पना व शब्दांचे अर्थ म्हणून त्या प्रकारे बघितले जातील.

a. "लागू अधिनियम" म्हणजे पुढील मधील कोणत्याही व सर्व लागू तरतुदी: (a) संविधान, करार, कायदे, अधिनियम, संहिता, नियम, नियमन, अधिसूचना, परिपत्रके, वटहुकुम किंवा कायद्याचे सामर्थ्य असलेले कोणत्याही सरकारी प्राधिकरणाचे आदेश, आणि (b) कोणत्याही सरकारी प्राधिकारणासह असलेले आदेश, निर्णय, मनाई हुकूम, निर्णय, अध्यादेश व वटहुकुम.

b. "ड्यु दिवस" म्हणजे असा दिवस ज्या दिवशी कर्जाच्या मुद्दल रकमेची इन्स्टॉलमेंट, व्याज आणि/किंवा ह्या कर्ज करारामध्ये देय असलेल्या अन्य कोणत्याही रकमेला त्या त्या स्थितीनुसार ह्या कर्ज करारामधील कोणत्याही विधानानुसार अदा करणे गरजेचे असेल.

c. "इलेक्ट्रॉनिक क्लीअरिंग सर्विसेस" किंवा "ईसीएच" आणि "नॅशनल ऑटोमेटेड क्लीअरिंग हाऊस" किंवा "एनएसीएच" म्हणजे डेबिट क्लीअर करणारी सेवा ज्यामध्ये ई- एनएसीएच किंवा भारतीय रिजर्व बँकेद्वारे अधिसूचित केलेल्या अन्य कोणत्याही प्रणालीचा सहभाग असू शकतो ज्याबद्दल कर्जदाराने ह्या कर्ज कराराच्या अंतर्गत इन्स्टॉलमेंट सुविधा घेण्यासाठी लिखित प्रकारे सहमती दिली आहे.

d. "इन्स्टॉलमेंट" म्हणजे प्रत्येक ड्यु दिवशी कर्जदाराने कंपनीला देणे आवश्यक असलेली रक्कम जी कर्ज अवधीमध्ये व्याजासह देणे कर्ज परतफेडीसाठी आवश्यक असेल.

e. "कर्ज करार" ह्यामध्ये हा कर्ज करार, त्यासोबत असलेल्या अनुसूची, अन्य कोणतीही परिशिष्टे, स्वागत पत्र, पूरक करार व संलग्नके असू शकतील तसेच ह्या कर्ज करारामधील अटी व शर्तीनुसार वेळोवेळी त्यामध्ये केल्या जाणारे बदलही त्यामध्ये समाविष्ट असतील.

f. "कर्ज" म्हणजे ह्या कर्ज कराराच्या अनुसूचीमध्ये निर्धारित केलेली लघु उद्योग कर्जाची रक्कम.

g. "कर्ज अर्ज" म्हणजे प्रत्यक्ष किंवा इलेक्ट्रॉनिक प्रकारे कर्ज देणा-यांना कर्जाची विनंती करण्यासाठी कर्जदाराने सादर केलेला कर्ज अर्ज.

h. "थकित ड्युज" म्हणजे कोणत्याही वेळी असलेली कर्जाची थकित रक्कम, इन्स्टॉलमेंटसह असलेला जमा झालेले व अदा न केलेले व्याज व त्यासोबतचे अन्य शुल्क, दंड शुल्क, खर्च, शुल्क जे लागू असेल व कर्जाच्या संदर्भात कर्जदाराकडून कंपनीला देणे बाकी असेल.

i. **"दंड शुल्क" ह्याचा अर्थ ह्या कर्ज कराराच्या कलम 16 मध्ये दिलेला अर्थ असेल.**

j. "पूर्व समाप्ती" म्हणजे कंपनीने त्या संदर्भात निर्धारित केलेल्या अटी व शर्तींनुसार व अशा परतफेडीच्या वेळी लागू असलेल्या वेळेआधीची परतफेड होय.

k. "व्याज दर" म्हणजे ह्या कर्ज कराराच्या कलम 3 मध्ये दिलेला व्याज दर.

l. "परतफेड" म्हणजे कर्जाच्या मुद्दल रकमेची व्याजासह इन्स्टॉलमेंटसच्या द्वारे परतफेड व त्यामध्ये दंड शुल्क किंवा अन्य शुल्क, कटिबद्धता आणि/किंवा अन्य शुल्क, ह्या कर्ज कराराच्या संदर्भात असलेल्या अटींनुसार अन्य शुल्क, फीस, अन्य ड्युज ह्यांचे पेमेंट व ह्या कर्ज कराराच्या कलम 7 मध्ये नमूद असलेले अमोर्टायजेशन.

m. "मान्यता पत्र" म्हणजे कंपनीने कर्जदाराला जारी केलेले असे पत्र ज्यामध्ये कर्जाला मान्यता दिली जाते व संबंधित तपशील, अटी व शर्ती निर्धारित केल्या जातात.

n. "अनुसूची" म्हणजे ह्या कर्ज कराराची अनुसूची.

o. "स्वागत पत्र" म्हणजे कंपनीने ह्या कराराला अमलात आणल्यानंतर कर्जदाराला जारी केलेले पत्र ज्यामध्ये ड्यु दिवस, प्रत्येक ड्यु दिवशी देय असलेले इन्स्टॉलमेंटस, इन्स्टॉलमेंटस पे करण्याची वारंवारता व प्रत्येक इन्स्टॉलमेंटमध्ये मुद्दल व व्याज दराचे ब्रेक-अप ह्यांचे तपशील दिलेले असतात.

**2. कर्जाच्या अटी:**

a. कर्ज अर्ज व मान्यता पत्रामध्ये दिलेल्या उद्देशासाठी कर्जदाराला कर्ज देण्यासाठी कंपनी ह्याद्वारे पुढे दिलेल्या अटींनुसार सहमती देत आहे.

b. ह्या कर्ज करारामध्ये देण्यात आलेले कर्ज ह्या अनुसूचीमध्ये दिलेल्या अवधीसाठी (कर्ज अवधी) असेल व त्याची सुरूवात वितरण दिनांकापासून होईल. ह्या कर्ज करारामध्ये निश्चित केलेल्या अटींनुसार थकित ड्युजसह कर्जदाराद्वारे कर्जाची संपूर्ण व अंतिम परतफेड केल्यास इथे दिलेल्या प्रकारे ह्या कर्ज कराराची समाप्ती वेळेच्या आधी झाल्यास कर्ज अवधी लवकर संपुष्टात येईल.

**3. व्याज:**

a. कर्ज रकमेवरील व्याज दर येथील अनुसूचीमध्ये दिल्याप्रमाणे असेल व कर्जदाराला ते (व्याज) कर्जाच्या वितरणाच्या दिवसापासून देणे आवश्यक असेल.

b. अनुसूचीमध्ये निर्धारित असलेले व्याज कर्जाच्या अवधीमध्ये स्थिर राहील. परंतु, कंपनीला आपल्या स्वयंनिर्णयानुसार कर्ज करार लागू असताना कर्जावर लागू असलेल्या आगामी व्याजामध्ये वेळोवेळी बदल करण्याचा- ते वाढवण्याचा किंवा कमी करण्याचा

अधिकार असेल. मान्यता पत्रामधील अटींनुसार असे बदल निश्चिअ होतील व ते कर्जदाराला 7 (सात) दिवस आधी कळवले जातील व ते कर्जदार व गॅरेंटरवर बंधनकारक असतील.

c. व्याज दररोज जमा होत जाईल व मासिक पद्धतीने ते एकत्र केले जाईल किंवा चुकलेल्या दिवसांच्या वास्तविक संख्येनुसार निश्चित केले जाईल.

d. ह्या कर्ज कराराअंतर्गत कर्ज घेणे हा एक आर्थिक व्यवहार आहे व व्याज दर लावण्याशी संबंधित उच्च दरासंबंधी असलेला किंवा अन्य कायद्यांअंतर्गत असलेला कोणताही बचाव कर्जदार/गॅरेंटर सोडून देत आहेत.

e. व्याजाची गणना- इन्स्टॉलमेंटमध्ये मुद्दल व व्याज असते व येथील अनुसूचीमध्ये दिलेल्या व्याज दराच्या आधारे गणना केलेला व्याज असतो व तो दर महिन्याला शिल्लक असलेल्या रकमेवर सर्वात जवळच्या रूपयाच्या रकमेपर्यंत राउंड ऑफ केला जातो.

**4. प्रशासकीय व प्रक्रिया शुल्क:**

कंपनीला अर्ज सादर करताना कर्जदाराने सहमती दिलेल्या ह्या कराराच्या अनुसूचीमध्ये दिल्याप्रमाणे कर्जाची प्रक्रिया व मान्यतेच्या संदर्भात सर्व शुल्क कंपनीला अदा करण्याविषयी कर्जदाराने आपली सहमती कोणत्याही दडपणाशिवाय किंवा अवांछित प्रभावाशिवाय दिली आहे. कोणत्याही परिस्थितीत- कर्ज दिले गेले नाहीतरी किंवा कंपनीने कर्जाला मान्यता देऊनही ते दिले नाही तरी कर्जदाराला प्रशासकीय व प्रक्रिया शुल्क परत केले जाणार नाही.

**5. वितरण:**

a. कर्जदार त्याला इच्छा असेल त्यानुसार कंपनीकडून अपेक्षित असलेली कर्जाच्या वितरणाची पद्धत कळवेल. परंतु, वितरणाची पद्धत निश्चित करण्याचा संपूर्ण अधिकार कंपनीचा आहे व ते वितरण ह्या कर्ज करामध्ये कर्जदाराला करण्यात येणारे कर्जाचे वितरण मानले जाईल. कर्जदाराच्या वतीने अन्य कोणत्याही पक्षाला करण्यात येणा-या अशा सर्व वितरणांना कर्जदाराला केले गेलेले वितरण मानले जाईल व त्यासाठी कर्जदार इथे मान्यता देत आहे.

b. ह्या कर्ज कराराच्या संदर्भात कंपनीने कर्जदाराला केलेले सर्व वितरण हे एनईएफटी/आरटीजीएस किंवा लागू कायद्यानुसार कंपनीच्या स्वयंनिर्णयानुसार अन्य मान्यताप्राप्त हस्तांतरणाच्या स्वीकृत केलेल्या पद्धतीद्वारे केले जाईल.

c. कर्जदार इथे सहमती देत आहे की, वितरणाचा दिनांक तो दिवस असेल ज्या दिवशी कंपनी एनईएफटी/आरटीजीएसद्वारे किंवा अन्य इलेक्ट्रॉनिक निधी हस्तांतरणाच्या अन्य कोणत्याही पद्धतीद्वारे थेट कर्जदाराच्या खात्यामध्ये पैसे जमा करेल. ("वितरण दिनांक").

d. कर्जदाराला कर्ज रद्द करता येणार नाही किंवा वितरणाला अमान्य करता येणार नाही.

**6. विमा:**

कर्जदाराच्या विनंतीनुसार आपल्या स्वयंनिर्णयाच्या आधारे कंपनी विविध जोखमींच्या विरोधात कर्जदाराला सुरक्षित करणा-या विमा पॉलिसीच्या विमा प्रिमियमलाही आर्थिक मदत करू शकते व ह्या जोखमींमध्ये मर्यादांशिवाय व्यक्तिगत अपघाताच्या जोखमी, अचानक होणारे हॉस्पिटलायजेशन, कंपनीला थकित असलेले ड्युज आणि/अन्य गंभीर रोग ह्यांचा समावेश असू शकतो, त्यासाठी हे आवश्यक आहे की, अशी विमा पॉलिसी कंपनीने स्वत:ची मान्यता असलेल्या विमा कंपनीकडून कर्जदाराच्या वतीने घेतलेली असली पाहिजे व त्यामध्ये विशिष्ट सूचना असली पाहिजे व कर्जदाराने त्या विमा कंपनीला अधिकार दिले पाहिजेत की, कोणत्याही हानीच्या स्थितीमध्ये नुकसान हे अशा विमा कंपनीद्वारे कंपनीला अदा केले जाईल. कर्जदार इथे अपरिवर्तनीय प्रकारे कंपनीला विमा प्रक्रियांचा दावा करण्यासाठी अनुमती देत आहे व ह्या कर्ज करारानुसार ड्यु व देय रकमेच्या विरोधात त्यांचा उपयोग करण्याची अनुमती देत आहे. कर्जदाराच्या वतीने कंपनीने अदा केलेला विमा प्रिमियम इथे दिल्या जाणा-या कर्जाच्या मुद्दल रकमेमध्ये जोडला जाईल व तो कर्जाचा भाग बनेल. कर्जाचा भाग असलेला विमा प्रिमियम कंपनीद्वारे कंपनीची मान्यता असलेल्या अशा विमा कंपनीला थेट वितरित केला जाऊ शकेल व असे वितरण हे कर्जदाराला झालेले वितरण मानले जाईल.

जर कर्जदाराने विमा सुरक्षा निवडली असेल व तो कंपनीद्वारे घेतल्या गेलेल्या 'समूह विमा पॉलिसीचा' सदस्य असेल, तर कंपनीला थकित ड्युजसाठी अशा भरलेल्या विम्याचा दावा वापरण्याचा अधिकार असेल. जर अशा प्रकारे निधी वळवल्यानंतर जर काही शिल्लक असेल, तर ती कर्जदाराला अदा केली जाईल. जर त्यामध्ये काही रक्कम कमी भरली, तर कर्जदार संपूर्ण बाकी रक्कम देण्यासाठी जवाबदार असेल.

**7. परतफेड:**

a. कर्जदार कंपनीला सर्व इन्स्टॉलमेंटस ड्यु दिवशी अदा करेल व जेव्हा लागू होईल तेव्हा शुल्क अदा करेल व त्यामध्ये कोणताही विलंब किंवा कुचराई करणार नाही. कर्जदार मान्य करत आहे की, कर्ज देण्याच्या अटीसाठी परतफेडीच्या अनुसूचीचे कठोर पालन ही आवश्यक अट आहे व वेळ ही ह्या करारामधील अत्यंत महत्त्वाची बाब आहे.

b. अनुसूचीमध्ये दिलेल्या अटींनुसार इन्स्टॉलमेंटसनुसार कर्जदाराद्वारे परतफेड केली जाईल. इथे खाली दिलेले परतफेड वेळापत्रक हे कंपनीच्या ह्या कर्ज करारामध्ये असलेल्या व्याज व ड्युजसह मागणीनंतर संपूर्ण कर्ज परत फेडण्याची मागणी करण्याच्या अधिकारावर कोणतीही बाधा आणत नाही. तसेच, इन्स्टॉलमेंटची गणना/निश्चिती करताना कोणत्याही वेळेस इन्स्टॉलमेंटची मोजणी चुकीच्या प्रकारे केली गेली असे समोर येण्यासह इन्स्टॉलमेंटच्या पुन: गणनेच्या कंपनीच्या अधिकारावर कोणतीही बाधा येणार नाही. परंतु, अनुसूचीमध्ये दिलेले इन्स्टॉलमेंटस कोणत्याही वेळी कर्ज करार रद्द करण्याच्या कंपनीच्या अधिकारावर बाधा आणत नाही व कंपनीला योग्य वाटल्यास कोणत्याही वेळी कंपनी असे करू शकते व आधीच ड्यु असलेल्या सर्व रकमांची व अनपेड रकमांची मागणी करू शकते व त्यासह भविष्यातील सर्व इन्स्टॉलमेंटस व ड्यु असू शकणा-या अन्य कोणत्याही रकमांची मागणी करू शकते व त्यावेळी कंपनीने आधी मान्य केलेल्या भविष्यातील इन्स्टॉलमेंटसवरील कोणत्याही सवलती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

c. कर्जदाराद्वारे कंपनीला देय असलेल्या सर्व रकमा ड्यु दिवशी किंवा त्याआधी कोणतीही घट न करता अदा केल्या जातील.

d. दंड शुल्क लावल्यामुळे कर्जदारांचे परतफेडीच्या वेळापत्रकाचे कठोर पालन करण्याचे दायित्व कमी होणार नाही व ती कर्ज देतानाची मुख्य अट असेल.

e. इन्स्टॉलमेंटची गणना करण्याची कंपनीची पद्धत तसेच मुद्दल व व्याजामध्ये त्याची विभागणी हे व्यवस्थित समजून घेतले आहे व मान्य केले आहे, ह्याची खात्री कर्जदार देत आहे.

f. जर ड्यु दिवस सुट्टीच्या दिवशी येत असेल, तर पेमेंट हे त्याच्या पुढच्याच कार्य दिवशी केले जावे.

g. ड्यु दिवसाच्या आधी कर्जदाराने कोणतीही अग्रिम पेमेंट कोणत्याही कारणाने केली असेल तर ती कर्जदाराच्या कर्ज खात्यामध्ये जमा केली जाईल. इन्स्टॉलमेंटच्या संदर्भात अशा जमा झालेल्या अग्रिम रकमेला केवळ ड्यु दिवशीच्या पेमेंटससाठीच एडजस्ट केले जाईल. अशा अग्रिम पेमेंटसमुळे व्याजामध्ये कोणतीही कपात विचारात घेतली जाणार नाही.

h. ह्या कर्ज कराराच्या कलम 15 नुसार पूर्वसमाप्तीच्या प्रकारे कर्जाची परतफेड करण्याचा निर्णय कर्जदार घेऊ शकतो.

i. ह्या करारामध्ये ड्यु होईल त्या वेळी संबंधित ड्यु दिवशी किंवा त्याआधी इन्स्टॉलमेंटस व शुल्क (असल्यास) अदा करण्यामध्ये कर्जदार अयशस्वी ठरला, तर कंपनी ह्या सुविधेचे वर्गीकरण विशेष उल्लेख खाते (एसएमए)/नॉन परफॉर्मिंग खाते (एनपीए) म्हणून करेल किंवा ड्यु दिवसाच्या शेवटी भारतीय रिजर्व बँकेच्या (आरबीआय) लागू मार्गदर्शक सूचनांनुसार अन्य प्रकारांमध्ये ठेवेल. एसएमए आणि एनपीए प्रकारांमधील वर्गीकरणासाठीचा आधार व त्याची उदाहरणे अनुसूचीमध्ये दिलेली आहेत.

**8. इन्स्टॉलमेंटसच्या पेमेंटचा प्रकार**

a. इथे दिलेल्या अटी व शर्तींच्या आधारे, कर्जाची परतफेड ही स्थायी निर्देश (स्टँडिंग इन्स्ट्रक्शन्स), इलेक्ट्रॉनिक क्लीअरन्स सिस्टीम (ईसीएस) किंवा एसीएच/ई- एनएसीएच किंवा कंपनीद्वारे वेळोवेळी स्वीकृत केलेल्या अशा अन्य पद्धतीद्वारे केली जाईल ज्यामध्ये कंपनीला ड्यु असलेले इन्स्टॉलमेंटस थेट कर्जदाराच्या बँक खात्यामधून डेबिट करण्यासाठी अधिकृत केले गेले असेल.

b. इन्स्टॉलमेंटसच्या पेमेंटसाठी कर्जदार कंपनीला ईसीएस किंवा एसीएच/ई- एनएसीएच आदेश उपलब्ध करून देईल. असे आदेश जारी करणे ह्याला कर्जदाराने कंपनीने असे आदेश संबंधित दिवशी अमलात आणण्यासाठी दिलेली निर्विवाद व अपरिवर्तनीय मान्यता समजले जाईल आणि अर्जदार हमी देईल की, ईसीएस किंवा एसीएच/ई- एनएसीएच आदेशांचा सादर झाल्यानंतर सन्मान केला जाईल. कोणत्याही कारणामुळे ईसीएस किंवा एसीएच/ई- एनएसीएच आदेश सादर झाले नाहीत तर त्यामुळे इन्स्टॉलमेंटस पे करण्याच्या कर्जदाराच्या दायित्वामध्ये किंवा देय असलेल्या अन्य कोणत्याही राशी व ह्या कर्ज करारामध्ये देय असलेल्या बाबी ह्यामध्ये कोणताही बदल होणार नाही.

c. जर कर्जदाराने कलम 8(a) च्या अनुषंगाने सादर केलेल्या एका किंवा सर्व ईसीएस किंवा एसीएच/ई- एनएसीएच आदेशांसंदर्भात असे झाले-

i. ते हरवले, नष्ट झाले किंवा कंपनीच्या ताब्यात असताना चुकीच्या जागी ठेवले गेले किंवा ii. स्वाक्षरी करणा-याच्या किंवा कोणत्याही किंवा अनेक स्वाक्षरी करणा-यांच्या (एकाहून अधिक असल्यास) मृत्यु, कर्जबाजारीपणा, गैरवर्तनामुळे, मान्यता समाप्त झाल्यामुळे किंवा अन्य प्रकारे कॅश करण्यासारखे उरले नाहीत किंवा ते जारी करणा-या बँकेने स्थगित केले किंवा लिक्विडेट केले, तर अशा स्थितीमध्ये कर्जदार अशा हानीची, नाशाची किंवा अयोग्य जागी ठेवल्या गेल्याची (जी स्थिती असेल त्यानुसार) माहिती कंपनीकडून मिळाल्यानंतर वरील कारणांमुळे हे चेक्स किंवा ह्या बाबी कॅश करण्यासारख्या न राहिल्याचे कळाल्यानंतर लगेचच नष्ट झालेल्या, हरवलेल्या किंवा कॅश करण्यासारख्या न राहिलेया चेक्सच्या संख्येइतकेच पुरेसे चेक्स

कंपनीला देईल किंवा कंपनीला मान्य असलेला व कंपनी स्वीकारेल असा परतफेडीचा पर्याय व पर्यायी योग्य व्यवस्था कंपनीला उपलब्ध करून देईल.

d. कर्जदाराला मान्य आहे व समजले आहे की, कोणत्याही कारणामुळे कोणताही चेक/आदेश कंपनीला मिळाला नाही, तर त्यामुळे ह्या कर्ज करारानुसार देय असलेल्या कर्जदाराच्या परतफेडीच्या रकमेच्या दायित्वामध्ये कोणताही बदल होणार नाही. कोणत्याही कारणामुळे कोणत्याही चेकला झालेला विलंब, अनुपस्थिती किंवा कॅश करण्यामधील दुर्लक्ष, हानी किंवा कोणत्याही चेक्स/आदेशांचे नुकसान (जे आधीच दिले गेले असतील किंवा कर्जदाराने कंपनीला देणे अपेक्षित असेल) झाल्यास त्यासाठी कोणत्याही प्रकारे कंपनी जवाबदार नसेल.

e. आवश्यक झाले तर कंपनीच्या अनुमतीनुसार कर्जदार एका बँकेमध्ये इश्यु व ड्रॉ केलेल्या चेक्स/आदेशाला दुस-या बँकेसोबत बदलू शकतो/इंटरचेंज करू शकतो व त्यासाठी अशा प्रत्येक बदलीच्या वेळी अनुसूचीत दिलेले बदलासाठीचे शुल्क भरणे गरजेचे असेल.

f. ह्या कर्ज कराराच्या अंतर्गत व प्रचलित कायद्यानुसार कंपनीला असलेल्या कोणत्याही अधिकारांना किंवा सुविधांना कोणतीही बाधा न येता, कर्जदाराला चेक कॅश न होण्याच्या प्रत्येक वेळी ह्या अनुसूचीत दिलेल्या दरानुसार चेक/आदेश फेटाळला जाण्याचे शुल्क भरणे गरजेचे ठरेल. /पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टीम्स एक्ट 2007 किंवा अन्य कोणत्याही वेळोवेळी सुधारित होऊन लागू असलेल्या व अन्य संबंधित अधिनियमांनुसार कंपनीला उपलब्ध असलेल्या अधिकारांना कोणतीही बाधा न येता चेक परत गेल्यानंतर लावण्यात येणारे शुल्क कंपनीद्वारे निश्चित केले जाईल.

g. बाहेर गावच्या चेक्सद्वारे जिथे रिमिटान्स केले जाते, तिथे कर्जदाराला अनुसूचीमध्ये दिलेल्या चेक संकलन शुल्काला भरावे लागेल व कंपनी स्वत:च्या निर्णयानुसार वेळोवेळी ह्या शुल्कांमध्ये सुधारणा करू शकेल.

h. अनुसूचीमध्ये दिलेले शुल्क कंपनीच्या स्वयंनिर्णयानुसार कधीही बदलू शकतात.

i. जोपर्यंत कर्ज किंवा त्याच्या कर्जाचा काही भाग ड्यु आहे तोपर्यंत कर्जदाराला ईसीएस किंवा एसीएच/ई- एनएसीएच आदेशांना रद्द करण्याचा किंवा पेमेंट थांबवण्याचा अधिकार नसेल व अशी कोणतीही कृती ही निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटस एक्ट, 1881/पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टीम्स एक्ट 2007 किंवा अन्य कोणत्याही वेळोवेळी सुधारित होऊन लागू असलेल्या व अन्य संबंधित अधिनियमांनुसार फसवणुकीच्या उद्देशाने केलेली व कारवाई टाळण्यासाठी केलेली कृती मानली जाईल व कंपनीला कर्जदाराच्या विरोधात योग्य ती फौजदारी कारवाई करण्याचा अधिकार असेल.

j. कर्जदाराला मान्य आहे, त्याने समजून घेतले आहे व सहमती दिली आहे की, कंपनी केवळ स्वत:च्या स्वयंनिर्णयानुसार वेगवेगळ्या वेळी व विभिन्न दिवशी कर्जदाराच्या बँक खात्यामध्ये असलेल्या ईसीएस/एसीएच किंवा ई- एनएसीएच आदेश किंवा अन्य कोणत्याही इलेक्ट्रॉनिक किंवा अन्य क्लीअरिंग आदेशाला बँकेसमोर ठेवेल (जो सर्व थकित ड्युजसह कंपनीच्या फेवरमध्ये कर्जदाराने दिला असेल) व तो जर पे झाला नाही तर कर्जदाराकडून थकित ड्युज प्राप्त करेल व संपूर्ण थकित ड्युज मिळेपर्यंत तो आदेश स्वत:कडे ठेवेल. कर्जदार सहमत आहे व कर्जदार हमी देत आहे की, कंपनीद्वारे करण्यात येणा-या अशा कार्यवाहीसंदर्भात तो विवाद करणार नाही, तक्रार करणार नाही किंवा आक्षेप घेणार नाही.

**9. इन्स्टॉलमेंटसमध्ये बदल व त्याचे वेळापत्रक नव्याने निश्चित होणे:**

a. कंपनी आपल्या स्वयंनिर्णयानुसार कोणत्याही दायित्वाशिवाय तिला योग्य वाटतील अशा अटी व शर्तीसह कर्जाचा पुढील अवधीसाठी आढावा घेण्याचा अधिकार सुरक्षित ठेवत आहे.

b. कंपनी स्वत:हून किंवा तिला योग्य वाटल्यास कर्जदाराच्या विनंतीनंतर इन्स्टॉलमेंटसमध्ये व त्याच्या वेळापत्रकामध्ये असे बदल करण्याचा निर्णय घेऊ शकेल व कर्जदाराच्या औपचारिक स्वाक्षरीसह परतफेड वरील बदलानुसार व नव्याने निश्चित केलेल्या वेळापत्रकासह केली जाईल व ह्या अनुसूचीमध्ये दिलेल्या बाबी त्या संदर्भात विचारात घेतल्या जाणार नाहीत. कर्जदार सुधारणेच्या आवश्यकतांचे पालन करेल व त्यासाठी सुधारित संरचनेनुसार ईसीएस किंवा एसीएच/ई- एनएसीएच आदेश देणे आवश्यक ठरेल.

c. कर्जदाराच्या कर्ज परतफेडीच्या ट्रॅक रेकॉर्डची स्थिती समाधानकारक असल्यास कंपनी स्वत:च्या निर्णयानुसार कर्जदाराला इथे दिलेल्या कर्जाव्यतिरिक्त अन्य अतिरिक्त कर्ज देऊ शकेल. वेळोवेळी कंपनीद्वारे निश्चित केलेल्या प्रचलित क्रेडीट नियमांनुसार कंपनीने निर्धारित केलेल्या कागदपत्रांच्या पूर्ततेनंतरचे असे अतिरिक्त कर्ज दिले जाऊ शकेल. ह्या विधानाचा वापर करून अतिरिक्त कर्जाचा दावा करण्याचा कोणताही अधिकार कर्जदाराला नसेल.

**10. डिफॉल्ट होण्याच्या घटना**

पुढील घटनांना "डिफॉल्ट होण्याच्या घटना (कुचराई)" मानले जाईल: -

a. कर्जदार आणि/किंवा गॅरेंटर दायित्व पूर्ण करण्यामध्ये अयशस्वी, कर्जाची परतफेड करण्यात अयशस्वी, कोणतेही इन्स्टॉलमेंट, शुल्क, फीस किंवा कंपनीला इथे दिलेल्या कोणत्याही प्रकारे ड्यु असलेली ती ड्यु होण्याच्या वेळेस कंपनीने मागितली असताना किंवा मागितली नसताना ती रक्कम देण्यामध्ये अयशस्वी होणे.

b. जर कंपनीच्या मताने कर्जदाराने कर्जाच्या संदर्भात काही महत्वाची माहिती दडवून ठेवली असेल; किंवा

c. कर्जबाजारीपण, व्यवसाय स्वेच्छेने किंवा अपरिहार्यपणे बंड करणे, उद्योग अयशस्वी ठरणे, बँकरप्सी करणे, कर्जदार/गॅरेंटरच्या क्रेडीटर्सची सामान्य नियुक्ती करणे किंवा कर्जदार/गॅरेंटरने कोणत्याही क्रेडीटर्सना पेमेंट करणे थांबवले किंवा थांबवण्याची धमकी दिली, इन्सॉल्व्हन्सी व्यावसायिकाची नियुक्ती केली, आपल्या संसाधनांवर प्राप्त करणारे/विश्वस्त किंवा अशा प्रकारच्या अधिकाराची नियुक्ती केली, कर्जदार/गॅरेंटरच्या वतीने किंवा विरोधात बँकरप्सीबद्दल कोणतीही याचिका केली किंवा कर्जदार/गॅरेंटरच्या कार्य समाप्तीसाठी कोणतीही याचिका केली आणि ती दाखल केल्यानंतर 30 दिवसांच्या आत ती परत घेतली नाही; किंवा

d. जर कर्जदार/गॅरेंटर (कंपनी असल्यामुळे) पुनर्व्यवस्था किंवा पुनर्रचनेच्या उद्देशाने कंपनीच्या लिखित पूर्व मान्यतेशिवाय लिक्विडेट झाले;

e. जर कर्जदार/गॅरेंटरने आपला व्यवसाय समाप्त केला किंवा समाप्त करण्याची धमकी दिली; किंवा

f. कंपनीद्वारे नियुक्त अकाउंटंट किंवा अकाउंटंटसच्या फर्मने (जे करण्यास कंपनी ह्याद्वारे अधिकृत केली गेली आहे व कंपनीला तो अधिकार आहे) असे प्रमाणित केले की, कर्जदाराचे दायित्व हे कर्जदाराच्या संसाधनांहून अधिक आहे किंवा कर्जदार नुकसान होत असलेला व्यवसाय करत आहे; किंवा

g. कर्जदाराकडून कंपनीला येथील अटी व शर्तींच्या संदर्भात दिले गेलेले किंवा देण्यात येणारे कोणतेही एसीएच/ई- एनएसीएच किंवा ईसीएस आदेश/चेक्स हे सादर केल्यानंतर कोणत्याही कारणाने फेटाळले गेले/एन्कॅश झाले नाहीत; किंवा

h. कोणत्याही कारणाने पेमेंट किंवा कोणतेही आदेश थांबवण्याची सूचना कर्जदाराने दिली किंवा कर्जदाराने कंपनीला जारी केलेले आदेश हे फेटाळले गेले; किंवा

i. कर्जदार/गॅरेंटरने येथील कोणत्याही अटी, नियामक बाबी व शर्तींचे उल्लंघन केले किंवा ह्या कर्ज करारामध्ये किंवा इथे असलेल्या अन्य कोणत्याही कागदपत्रामध्ये दिलेली कोणतीही माहिती किंवा दावा असत्य, सदोष किंवा दिशाभूल करणारा आढळला; किंवा

j. कर्जदाराचा मृत्यु/अनुचित वर्तन किंवा अन्य कोणत्याही कायदेशीर अक्षमतेमुळे किंवा

k. कंपनीच्या पूर्व लिखित सहमतीशिवाय कर्जदाराच्या संविधानामध्ये किंवा व्यवस्थापनामध्ये कोणताही लक्षणीय बदल किंवा पुनर्रचना झाल्यास किंवा कर्जदाराच्या व्यवस्थापनावर कंपनीचा असलेला विश्वास गमावल्यास; किंवा

l. अन्य कोणत्याही व्यक्तीसोबत अन्य कोणतेही कर्ज/सुविधा/अन्य कराराचे कोणातेही उल्लंघन कर्जदार/गॅरेंटरने केल्यास; किंवा

m. कंपनीसोबत अन्य कोणत्याही करारामध्ये कर्जदार किंवा गॅरेंटर असलेल्या कर्जदार/गॅरेंटरने अन्य कोणतीही कसूर कर्जदार/गॅरेंटर म्हणून केल्यास; किंवा

n. ह्या कर्ज करारामधील किंवा अन्य कोणत्याही संबंधित कागदपत्रातील कोणतेही दायित्व पार पाडणे कर्जदारासाठी अवैध ठरल्यास किंवा ह्या करारातील कोणत्याही दायित्वाची पूतता करणे गॅरेंटर किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीसाठी (कर्जदारासह) अवैध ठरल्यास; किंवा

o. कर्जदार/गॅरेंटरने ह्या कर्ज कराराला किंवा अन्य कोणत्याही संबंधित कागदपत्राला फेटाळल्यास किंवा फेटाळण्याची त्याची इच्छा असल्याचा पुरावा मिळाल्यास; किंवा

p. जर कर्ज किंवा त्याचा कोणताही भाग हा कर्जदाराने ज्या उद्देशासाठी त्याचा अर्ज केला होता व ज्यासाठी कंपनीने त्याला मान्यता दिली होती, त्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही उद्देशासाठी वापरल्यास; किंवा

q. अशी घटना घडली किंवा घटनाक्रम घडला आणि कंपनीच्या मते त्यांचा कर्जदाराच्या परतफेड क्षमतेवर विपरित परिणाम होण्याची सकारण शक्यता असेल; किंवा

r. कर्जदाराची/गॅरेंटरची स्थिती निवासीपासून अनिवासी अशी बदलली; किंवा

s. जर कर्जदाराच्या/गॅरेंटरच्या विरोधात कोणतीही ऍटॅचमेंट, तणाव, कार्यवाही किंवा अन्य प्रक्रिया लागू केली गेली किंवा वसूल केली गेली; किंवा

t. जर कोणत्याही विधीच्या न्यायालयाने किंवा सरकारी प्राधिकरणाने कर्जदार किंवा गॅरेंटरला कोणत्याही गुन्ह्यासंदर्भात आरोपी ठरवले असेल किंवा दोषी ठरवले असेल; किंवा

u. जर कर्जदार/गॅरेंटर कंपनीसोबत किंवा कंपनीच्या संलग्न संस्थेसोबत केलेल्या ह्या किंवा अन्य कोणत्याही करारामधील कोणत्याही अटींबद्दल विवाद करत असेल; किंवा

v. जर कोणतीही डिफॉल्टची घटना किंवा डिफॉल्टची होऊ शकणारी घटना घडली, तर कर्जदार कंपनीला त्याची सूचना लिखित प्रकारे 3 (तीन) दिवसांच्या आत देईल व त्यामध्ये अशा डिफॉल्ट घटनेच्या स्थितीबद्दल स्पष्ट माहिती देईल. कंपनी अधिनियम, 2013 किंवा अन्य कोणत्याही कायदा किंवा कायदेशीर दावा किंवा कायदेशीर प्रक्रियेच्या अंतर्गत कोणतीही समाप्तीची (वाइंडिंग अप) बंधनकारक सूचना कर्जदार/गॅरेंटरच्या विरोधात दाखल केली जाऊ शकेल/प्रक्रिया सुरू केली जाऊ शकत असेल, तेव्हा कर्जदार/गॅरेंटर अशी सूचना मिळाल्यापासून 3 (तीन) दिवसांच्या आत कर्जदार/गॅरेंटर कंपनीला लगेचच कळवेल; किंवा

w. जर कर्जदार एक कंपनी असेल तर ती तिच्या संचालक मंडळावर अशा व्यक्तीचा समावेश करणार नाही जिचे नाव जाणून बुजून डिफॉल्ट करणा-यांच्या यादीमध्ये असेल; आणि अशी व्यक्ती जर संचालक मंडळामध्ये आढळली, तर ती कंपनी अशा व्यक्तीला संचालक मंडळातून काढून टाकण्यासाठी कठोर आणि प्रभावी पावले उचलेल किंवा बिजनेस बदलेल किंवा नवीन उद्योग सुरू करेल किंवा नवीन क्षेत्रात उद्योग सुरू करेल किंवा व्यवस्थापनामध्ये कोणताही अन्य व्यावहारिक बदल करेल; किंवा

x. वरीलपैकी कोणतीही घटना/परिस्थिती घडली आहे अथवा नाही ह्या प्रश्नाच्या संदर्भात कंपनीचा निर्णय अंतिम, निर्णायक व कर्जदार/गॅरेंटरवर बंधनकारक असेल.

y. गॅरेंटरद्वारे देण्यात येणा-या हमीमध्ये असलेली अशी कोणतीही त्रुटि/कसूर ज्यामुळे हमी अव्यवहार्य/अप्रभावी ठरेल.

**11. समाप्ती व कंपनीचे अन्य अधिकार:**

(a)

1. सूचना: परतफेडीमध्ये डिफॉल्टसह डिफॉल्ट होण्याच्या वरील अन्य कोणत्याही घटना घडण्याच्या स्थितीत, कंपनी कर्जदार/गॅरेंटरला 7 दिवसांची सूचना जारी त्याच्या/तिच्या कंपनीकडे नोंदणीकृत असलेल्या पत्त्यावर पाठवेल व कर्ज सुविधेअंतर्गत देय असलेल्या संपूर्ण रकमेचे कर्ज पूर्णत: भरण्याची मागणी करेल. पोस्ट केल्यानंतर दुस-या दिवशी किंवा प्रत्यक्ष मिळाल्याच्या दुस-या दिवशी- जो दिवस लवकर असेल तो- ही सूचना कर्जदाराला/गॅरेंटरला प्राप्त झाली, असे मानले जाईल व कोणत्याही कारणामुळे कर्जदार/गॅरेंटरला कंपनीच्या कोणत्याही अनधिकृत अधिका-याद्वारे पाठवण्यात आलेली अशी जारी केलेली सूचना परत आली तरीही हेच मानले जाईल व ही सूचना कर्जदार/गॅरेंटरसाठी बंधनकारक व अंतिम असेल.

2. सूचना रद्द होणे: ह्या कर्ज करारामध्ये दिलेल्या कोणत्याही घटकांमुळे कोणतीही बाधा न येता, वर दिलेल्या सूचना कलम 10 (c), (d), (j), (k), (n), (r), (s) आणि (t) मध्ये दिलेल्या कोणतीही घटना घडण्याच्या स्थितीमध्ये कंपनीच्या स्वयंनिर्णयानुसार रद्द केल्या जाऊ शकतात.

(b) समाप्ती:

कंपनीद्वारे कर्ज करार समाप्त केल्यानंतर:

1. कर्जदार आणि गॅरेंटरला देय असलेल्या बाकी रकमेच्या पेमेंटसाठी इन्स्टॉलमेंटचा लाभ मिळणार नाही व ती रक्कम तत्काळ एकत्र ड्यु होईल व त्यामध्ये आधी असलेल्या थकबाकीचे घटक- जसे बाकी असलेल्या इन्स्टॉलमेंटस, दंड शुल्क किंवा अन्य कारणाने बाकी झालेले घटक असतील.

2. समाप्तीच्या दिनांकापासून अन्य सर्व शुल्कांसह संपूर्ण पेमेंट प्रत्यक्ष मिळेपर्यंतच्या दिवसापर्यंत अनुसूचीमध्ये दिलेल्या दरानुसार दंड शुल्क व आदेश फेटाळला गेल्याचे शुल्क देण्यासाठी कर्जदार जवाबदार असेल.

3. निगोशिएबल इन्स्ड्रुमेंटस एक्ट, 1881 चे कलम 138, पेमेंट ऑफ सेटलमेंट सिस्टीम एक्ट, 2007 मधील कलम 25 नुसार व इतर लागू कायद्यांनुसार कर्ज अवधीमध्ये उपलब्ध असलेल्या अन्य अधिकार व सुविधांचा अधिकार कंपनी करू शकेल.

(c) कंपनीचे अन्य अधिकार:

1. थकित रकमेच्या वसुलीसाठी कंपनीला कोणतीही कायदेशीर कारवाई करता येण्याच्या अधिकारांवर कोणतीही बाधा न येता, कर्जदार आणि गॅरेंटर स्पष्ट प्रकारे मान्य करत आहेत की, कंपनीला तिला योग्य वाटेल अशा स्थितीमध्ये तिस-या पक्षाला नियुक्त करण्याचा अधिकार असेल व ह्या कर्ज करारामध्ये कर्जदाराच्या पूर्व सहमतीशिवाय कंपनीच्या वतीने कर्जदाराचे ड्युज गोळा करण्यासह कंपनीला असलेले सर्व किंवा कोणतेही कार्य, अधिकार व क्षमता तिस-या पक्षाल असेल.

2. ह्या कर्ज करारामध्ये अन्यत्र दिलेल्या बाबींना कोणतीही बाधा न येता, अशा समाप्तीनंतर कर्ज चालू ठेवणे हा कंपनीचा केवळ स्वत:चा निर्णय असेल व कंपनीने ठरवलेल्या विशिष्ट वेळी कर्जदाराची थकित रक्कम कंपनीला देय असेल. कोणत्याही वेळी केवळ स्वत:च्या निर्णयानुसार व कोणतेही कारण न देता कंपनी कर्जदाराला कर्जदाराचे थकित परत करण्यास सांगू शकते व असे झाल्यास कर्जदार असे सांगितल्यावर तत्काळ कर्जदाराची संपूर्ण थकित रक्कम कोणताही विलंब न करता कंपनीला पे करेल. कर्जदाराकडून देय असलेल्या ड्युजची रक्कम कर्जदारासाठी अंतिम आणि बंधनकारक असेल.

3. कर्जाच्या संदर्भात आणि/किंवा कर्जदाराच्या अन्य आर्थिक व्यवहारांच्या संदर्भात फसवणुकीच्या कृतीची किंवा गैर प्रकाराची शंका असेल, तर कंपनी स्वत: आपले कर्मचारी, एजंटस वापरून आणि/किंवा स्वत: निवडलेले बाह्य ऑडीटर्स/अकाउंटंटस वापरून कर्जदाराचे खर्च व आर्थिक बाबींचे बाह्य ऑडिट करण्यास पात्र असेल. ह्या ऑडीटसाठी जेव्हा केव्हा कंपनीचे कर्मचारी, एजंटस, अकाउंटंटस, ऑडीटर्स माहिती मागतील तेव्हा त्यांना आवश्यक असलेली कोणतीही माहिती/नोंदी देणे व त्यांना आपल्या कार्यालयात/परिसरामध्ये प्रवेश देणे हे कर्जदाराचे दायित्व असेल. कंपनीला आपले कर्मचारी, एजंटस आणि/किंवा बाह्य ऑडीटर्स/अकाउंटंटस ह्यांच्याकडून मिळालेल्या ऑडीट रिपोर्टसनुसार किंवा जेव्हा कर्जदाराच्या सहकार्याच्या अभावी सादर झालेला

ऑडीट रिपोर्ट अपर्याप्त किंवा विलंबित राहतो, तेव्हा कंपनीला तिच्या अन्वेषण/मूल्यमापनाच्या वेळेस मिळालेल्या नोंदी/संबंधित साहित्याच्या आधारे कर्जाच्या खात्याची स्थिती फसवणुकीच्या प्रकारातील किंवा अन्य प्रकारची म्हणून घोषित करण्याचा अधिकार असेल. कर्जाची स्थिती फसवणुकीच्या प्रकारातील किंवा अन्य प्रकारची म्हणून घोषित करण्यासाठी आरबीआयच्या ह्या संदर्भातील प्रचलित मार्गदर्शक सूचनांचे पालन करेल.

4. कंपनीमध्ये कर्जदाराचे एकपेक्षा जास्त कर्ज खाते असेल किंवा कर्जदाराच्या ग्रूप कंपन्यांची कंपनीमध्ये कर्ज खाती असतील आणि कंपनीने कर्जदाराच्या एका कर्ज खात्याला फसवणुकीचे म्हणून घोषित केले असेल, तर कंपनी कर्जदाराच्या इतर खात्यांना/जिथे कर्जदाराचे एक किंवा अधिक प्रमोटर/पूर्णकालीन संचालक समान असतील अशा इतर ग्रूप कंपन्यांची पडताळणी करण्यासाठी/वरील प्रकारे ऑडीट करण्यासाठी पात्र असेल.

5. कर्जदाराची कर्ज खाती/त्याच्या ग्रूप कंपन्यांमध्ये होणा-या फसवणुकीच्या घटनांची माहिती योग्य त्या कायदा पालन करणा-या एजन्सीज जसे पोलिस आणि/किंवा आरबीआयच्या अन्य संबंधित यंत्रणांना कळवण्यासाठीही पात्र असेल.

**12. योग्य वापर:**

(a) कंपनीला ह्या कर्ज करारामध्ये ड्यु व देय असलेल्या कोणत्याही पेमेंटला व पुढील बाबींच्या संदर्भात कंपनीला ज्या कोणत्याही प्रकारे योग्य वाटेल त्या प्रकारे कर्जदाराने ड्युजसाठी पे केलेल्या रकमेला योग्य प्रकारे वापरण्याचा अधिकार असेल:

1. देय मुद्दलीची परतफेड.
2. व्याज
3. दंडात्मक शुल्क, असल्यास.
4. खर्च, शुल्क, व्यय व अन्य रकमांवरील व्याज
5. खर्च, शुल्क, व्यय व अन्य रकमा

येथील पक्षांमध्ये स्पष्ट प्रकारे सहमती झालेली आहे की, कर्ज कराराव्यतिरिक्त जर कर्जदार/गॅरेंटरचे कंपनीसोबत स्वत:च्या नावे किंवा त्यांच्या नाम निर्देशित व्यक्तींच्या किंवा प्रतिनिधींच्या नावे कर्जदार/भाड्याने घेणारा/भाड्याने देणारा किंवा गॅरेंटर म्हणून अन्य कोणतेही कर्ज खाते किंवा अन्य करार असतील किंवा भविष्यामध्ये असे होणार असतील; तर:

(b) ह्या कर्ज करारानुसार कर्जदार/गॅरेंटरने त्याच्या नाम निर्देशित व्यक्ती, प्रतिनिधींना केलेले कोणतेही पेमेंट हे फक्त "खात्यावरील पेमेंट" म्हणून बघितले जाईल व कर्जदाराने, त्यांच्या नाम निर्देशित व्यक्ती किंवा प्रतिनिधींनी कंपनीसोबत केलेल्या कोणत्याही करारांच्या संदर्भातील केवळ कंपनीच्या स्वयंनिर्णयानुसार कंपनी त्या पेमेंटचा वापर करेल व हा वापर त्या अवधीमध्ये किंवा त्यानंतर होऊ शकेल व विरोधामध्ये कोणतेही विशिष्ट निर्देश असूनही कंपनीला जे योग्य वाटेल, त्यानुसार ते केले जाईल.

**13. कर्जदार आणि गॅरेंटरचे वचन आणि निवेदन**

कर्जदार आणि गॅरेंटर येथे प्रमाणित करत आहेत, स्वीकृती देत आहेत व कंपनीला घोषित करत आहेत की-

a. कर्जदार आणि गॅरेंटर भारतीय नागरिक असून सामान्यत: भारतात राहतात व ते ह्या कर्जाच्या मुदतीमध्ये भारतात राहतील.

b. ह्या कर्ज करारामध्ये प्रवेश करण्याची व त्यावर कार्यवाही करण्याची पुरेशी कायदेशीर क्षमता कर्जदार/गॅरेंटरकडे आहे. कर्जदार/गॅरेंटर ह्यांना कोणत्याही प्रकारे कोणत्याही कायद्याद्वारे, अधिनियम, आदेश, वटहुकुम, अध्यादेश, करार किंवा अन्य प्रकारे ह्या कर्ज करारामध्ये दिलेल्या दायित्वांच्या स्वीकारापासून व कार्यवाहीपासून प्रतिबंधित किंवा निर्बंधित करण्यात आलेले नाही. कार्यवाही झाल्यानंतर ह्या कर्ज करारामधील अटींच्या संदर्भात सक्तीने राबवण्यात येऊ शकेल अशा प्रकारे कर्जदार/गॅरेंटरसाठी हा कर्ज करार त्यांच्यावर कायद्याने बंधनकारक व वैध असलेली कटिबद्धता असेल. कर्जदार/गॅरेंटर (जर कंपनी/भागीदारी/अन्य कॉरपोरेट बॉडी असल्यास) योग्य प्रकारे सुव्यवस्थित केलेली यंत्रणा असेल व भारतीय कायद्यांनुसार कार्यरत असेल व तिला ह्या कर्ज करारामध्ये प्रवेश घेण्याचे योग्य अधिकार व पात्रता असेल व ह्यामध्ये ती एक पक्ष असेल व तिचे प्रतिनिधीसुद्धा योग्य प्रकारे अधिकार दिले गेलेले असतील.

c. ह्या कर्ज करारावरची कार्यवाही ही कोणत्याही कायद्या/संविधानाच्या कागदपत्रांशी कोणत्याही प्रकारे विसंगत नाही आहे किंवा कर्जदार/गॅरेंटरवर बंधनकारक असलेल्या कोणत्याही अन्य कागदपत्राच्या विपरित नाही आहे.

d. कर्जदाराने/गॅरेंटरने ह्या कर्ज कराराच्या संदर्भात आवश्यक ती सर्व प्रकारची अधिकृत अनुमती, मान्यता, सहमती, लायसन्स व अनुमती देण्याकरता व ती लागू करण्याकरता आवश्यक असेल ते सर्व केले आहे.

e. कंपनीने किंवा कंपनीच्या अन्य सर्व अधिकृत प्रतिनिधींनी पाठवलेल्या खात्यांची सर्व विधाने कर्जदाराने स्वीकृत केलेली आहेत व कर्जदाराकडून कोणत्याही ड्यु असलेल्या रकमेच्या योग्यतेचा निर्णायक पुरावा गॅरेंटर असेल.

f. कोणताही पत्र व्यवहार हा कर्जदार/गॅरेंटरद्वारे करण्यात येणा-या पत्त्यावर केला जाईल व तो पाठवल्यानंतर 2 दिवसांच्या आत पोहचल्याचे मानले जाईल व कर्जदार आणि गॅरेंटरच्या पत्त्यामध्ये काही बदल होण्याच्या स्थितीमध्ये, ते कंपनीला त्याची तत्काळ माहिती देतील व असे न होण्याच्या स्थितीमध्ये त्यांनी शेवटच्या दिलेल्या पत्त्यावर पाठवलेली सूचना किंवा पत्र व्यवहार हा त्यांना पाठवला गेला आहे, असे मानले जाईल.

g. कर्ज करारामध्ये असलेला कंपनीचा अधिकार व दायित्वे पूर्णत: किंवा अंशत: किंवा कंपनीला योग्य वाटेल अशा प्रकारे व अशा अटींसह विकण्याचा, नियुक्त करण्याचा किंवा हस्तांतरित करण्याचा अधिकार कंपनीला असेल व कर्जदाराला/गॅरेंटरला कोणतीही सूचना न देता कंपनी त्याबद्दल निर्णय घेऊ शकेल व अशा कोणत्याही विक्री, नियुक्ती किंवा हस्तांतरणाची बाब ही कर्जदार/गॅरेंटरवर बंधनकारक असेल व त्यांना ह्या कर्ज करारामधील लाभ किंवा दायित्व प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रकारे नियुक्त करण्याचा अधिकार नसेल.

h. कर्जदाराचे प्रतिनिधित्व करणा-या व्यक्तीच्या कर्ज घेण्याच्या क्षमतेचा अभाव किंवा कमकुवत क्षमता किंवा त्याच्या कार्यवाहीमधील कोणतीही अनियमितता ह्यामुळे कर्जदार व गॅरेंटरच्या विरोधातील ह्या कर्ज करारानुसार असलेल्या कंपनीच्या कोणत्याही अधिकारावर अनुपस्थिती, कमकुवत क्षमता किंवा अनियमिततेमुळे बाधा येणार नाही.

i. कर्जदार/गॅरेंटरने सर्व कर भरले आहेत व देय असलेले बंधनकारक ड्युज भरले आहेत व त्यांना कोणतीही व्यक्ती किंवा प्राधिकरणाकडून कोणतीही मागणी, दावा किंवा सूचना मिळालेली नाही. तसेच, ह्या व्यवहाराच्या संदर्भात सध्या असलेल्या व भविष्यात होऊ शकणा-या सर्व कर, मूल्यमापने, दर, अधिभार, शुल्क व अन्य खर्चाचे वहन कर्जदार करेल. तसेच, सरकारद्वारे किंवा येथील व्यवहारामधील इन्स्टॉलमेंटसवर लावण्यात येणारे कोणतेही दर, शुल्क, खर्च, लेव्हीज आणि/किंवा रकमा ह्यामध्ये वाढ केल्यास किंवा ह्या कर्ज करारामध्ये प्रवेश केल्यामुळे जेव्हा कंपनीला अधिक शुल्क देय होतील, तेव्हा इन्स्टॉलमेंटस आपोआप वाढतील.

j. कर्जदार/गॅरेंटर ह्यांच्या विरोधात कोणतेही दावे, कार्यवाही किंवा खटले कोणत्याही स्वरूपाचे प्रलंबित नाही आहेत व ते होण्याची किंवा दाखल करण्याची (दिवाणी किंवा फौजदारी स्वरूपाचे किंवा अन्य प्रकारचे) शक्यता नाही, ह्याची खात्री.

k. कर प्रणाली किंवा अन्य कोणत्याही विषयासंदर्भात कोणत्याही कायद्यासंदर्भात कर्जदाराचे/गॅरेंटरचे अधिकार किंवा स्थिती ह्यासंदर्भात कंपनीची भविष्यात कोणतीही जवाबदारी नसेल, ह्याची खात्री.

l. संपूर्ण कर्ज फक्त कर्ज अर्ज आणि खाली दिलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या उद्देशासाठीच वापरले जाईल आणि ते बेकायदेशीर/असामाजिक क्रियाकलापांसाठी किंवा सट्टेबाजीसाठी वापरले जाणार नाही, ज्यामध्ये भांडवली बाजारात गुंतवणूक (ज्यात शेअर्स, बाँड्स आणि इतर आर्थिक सिक्युरिटीज समाविष्ट आहेत) किंवा रिअल इस्टेट किंवा सोन्याच्या कोणत्याही स्वरूपात खरेदी (प्राथमिक सोने, सोन्याचे बुलियन, सोन्याचे दागिने/नाणी, मौल्यवान दगड/धातू, एक्सचेंज ट्रेडेड फंड्स (ETF) युनिट्स आणि सोन्याच्या म्युच्युअल फंड युनिट्स) समाविष्ट आहे. कंपनीला हे करण्याची जबाबदारी नसली तरी, कंपनीला कर्जाच्या अंतिम वापरावर देखरेख ठेवण्याचा अधिकार असेल, ज्यामध्ये कंपनीच्या पूर्ण विवेकाधिकाराने नियुक्त केलेल्या कोणत्याही लेखापरीक्षक किंवा सल्लागारामार्फत आवश्यक प्रमाणपत्रांसह, आणि याचा खर्च कर्जदाराने करावा.

m. अन्य बँका व आर्थिक संस्थांकडून कोणतीही रक्कम कर्जाने घेण्याच्या आधी कंपनीची लिखित पूर्व अनुमती घेण्यात येईल.

n. कंपनीला ड्यु असलेल्या पेमेंटसच्या संकलनामध्ये किंवा त्याच्या प्रयत्नामध्ये कंपनीला होऊ शकणा-या कोणत्याही खर्चासाठी कंपनीला पैसे देण्यासाठी जवाबदार- ज्यामध्ये पोस्टेज खर्च, टेलिग्राम, टेलेक्स, नोंदणीकृत टपाल, टेलिफोन कॉल्स, कायदेशीर प्रक्रियेचा खर्च व संकलनासाठी नियुक्त व्यक्तींना पाठवण्याचा अतिरिक्त खर्च इ. चा समावेश असेल.

o. कर्जदाराने दिलेले सर्व तपशील, निवेदने, घोषणापत्रे व माहिती सत्य, योग्य, पूर्ण, अद्ययावत, वैध आहे आणि सर्व अर्थाने परिपूर्ण आहे व कोणतीही माहिती दडवण्यात आलेली नाही. जेव्हा केव्हा आवश्यक असेल, तेव्हा कर्जदार आवश्यक ते अपडेशन देईल. कर्जदाराच्या विरोधात कोणतीही याचिका, लवादाची किंवा प्रशासनिक कारवाई किंवा अन्य प्रक्रिया झाल्यास तत्काळ कंपनीला सूचित करणे.

p. जर कर्जदार व्यक्ती नसून संSथा असेल, तर ते त्यांच्यावर किंवा त्यांच्या बिजनेसवर लागू असलेल्या सर्व कायद्यांचे पालन करतील.

q. जर कर्जदार कंपनी असेल, तर कर्जदाराला ही सुविधा घेण्याचा अधिकार असेल आणि एकूण कर्ज हे निर्धारित मर्यादेच्या आत असेल.

r. कंपनीद्वारे वेळोवेळी निश्चित करण्यात येणा-या कंपनीच्या नियमांचे पालन कर्जदार करेल व ते त्याच्यावर बंधनकारक असतील.

s. कंपनीला कर्जदार/गॅरेंटरच्या सर्व संबंधित खात्यांवर सुरक्षा अधिकार असेल व त्यामध्ये अशीही खाती असतील जी नंतर कर्जदार/गॅरेंटरशी संबंधित असल्याचे आढळेल (ह्या ठिकाणी संबंधित खात्यामध्ये अशी सर्व खाती येतील जिथे कर्जदार गॅरेंटर आहे व गॅरेंटर कर्जदार आहे व त्यांनी कंपनीकडून कोणतीही आर्थिक सुविधा घेतलेली आहे).

t. कर्जदार/गॅरेंटर प्रमाणित करत आहेत की, आरबीआयच्या केवायसी मार्गदर्शक सूचनांमध्ये व्याख्या केल्यानुसार त्यांचे कुटुंब सदस्य/जवळचे नातेवाईक राजकीय प्रकारे एक्स्पोज झालेले व्यक्ती नाही आहेत. वरील स्थितीमध्ये कोणताही बदल झाल्यास त्याबद्दल तत्काळ कंपनीला माहिती देण्याची स्वीकृतीसुद्धा कर्जदार देत आहे.

u. वेळोवेळी निर्धारित होणा-या कंपनीच्या क्रेडीट धोरणांमध्ये वर्जित असलेल्या किंवा देशातील सामाजिक व आर्थिक वातावरणावर विपरित परिणाम करणा-या किंवा कोणत्याही प्रकारच्या हानिकारक ठरणा-या कृतीमध्ये ते प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रकारे सहभाग घेणार नाहीत, असे कर्जदार येथे घोषित करत आहे.

v. जाणीवपूर्वक डिफॉल्ट करण्याच्या स्थितीमध्ये कंपनीला भारतीय रिजर्व बँकेच्या (आरबीआय) प्रचलित नियमांच्या अनुपालनासाठी कर्जदार आणि/किंवा गॅरेंटर ह्यांना डिफॉल्टर प्रकारात टाकण्याचा व त्याची माहिती क्रेडीट माहिती कंपन्यांना (सीआयसी) देण्याचा व जाणीवपूर्वक डिफॉल्ट करणा-याचे नाव आणि फोटोग्राफ (ज्यामध्ये कर्जदार आणि/किंवा गॅरेंटरचे प्रोप्रायटर्स/भागीदार/संचालक/प्रमोटर्स/प्रभारी व्यक्ती/कर्जदार आणि/किंवा गॅरेंटरच्या कामांच्या व्यवस्थापनासाठी जवाबदार असलेले व डिफॉल्टर घोषित झालेले लोक ह्यांचा समावेश असेल) वृत्तपत्रामध्ये व कंपनीला योग्य वाटेल अशा अन्य कोणत्याही पद्धतीने देण्याचा अधिकार असेल.

"जाणीवपूर्वक केलेले डिफॉल्ट" आणि "डिफॉल्टर" ह्या संकल्पनांना भारतीय रिजर्व बँक (ट्रीटमेंट ऑफ विलफुल डिफॉल्टर्स अँड लार्ज डिफॉल्टर्स) निर्देश, 2024 व त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या सुधारणांमध्ये जो अर्थ दिला आहे तो अपेक्षित आहे.

जाणीवपूर्वक केलेल्या डिफॉल्टरच्या वर्गीकरणाच्या संदर्भात कर्जदार व गॅरेंटर पुढे आणखी वचन देतात:

i कर्जदार किंवा त्यांचे कोणी संचालक/प्रमोटर्स/भागीदार/प्रभारी व्यक्ती/कर्जदाराच्या कामाच्या व्यवस्थापनासाठी जवाबदार व्यक्ती ह्यापैकी कोणी जाणीवपूर्वक डिफॉल्टर म्हणून घोषित झालेले नाहीत. जर कंपनी असेल तर कर्जदार आरबीआय/सीआयसीच्या जाणीवपूर्वक डिफॉल्ट करणा-यांच्या सूचीत नाव आलेल्या व्यक्तीला संचालक म्हणून ठेवणार नाही किंवा जर ती भागीदारी तत्वावरील फर्म असेल तर भागीदार ठेवणार नाही किंवा आपल्या कामाच्या व्यवस्थापनासाठी प्रभारी आणि जवाबदार म्हणून ठेवणार नाही. जर अशा प्रकारे नियुक्त झालेली आणि कर्जदाराचा संचालक/भागीदार/प्रभारी म्हणून काम करणारी व्यक्ती ही डिफॉल्टर म्हणून आढळली, तर संचालक/भागीदार/प्रभारी व व्यवस्थापनाचा जवाबदार म्हणून त्या व्यक्तीला काढून टाकण्यासाठी कर्जदाराला कठोर व प्रभावी पावले उचलावी लागतील. प्रमाणित केले जाते की, कोणत्याही परिस्थितीमध्ये जोपर्यंत प्रमोटर आणि/किंवा संचालक आणि/किंवा प्रभारी व व्यवस्थापनाचा जवाबदार व्यक्ती ह्याचे नाव जाणीवपूर्वक डिफॉल्ट केलेल्यांच्या

यादीमध्ये आहे, तोपर्यंत कोणत्याही परिस्थितीमध्ये कंपनी कर्जदाराला देण्यात आलेल्या क्रेडीट सुविधांना रिन्यु करणार नाही/त्यात भर घालणार नाही/नवीन क्रेडीट सुविधा देणार नाही किंवा देण्यात येणा-या सुविधांची पुनर्रचना करणार नाही.

ii कर्ज किंवा त्याचा कोणताही भाग हा फक्त ज्या उद्देशासाठी ते मान्य करण्यात आलं आहे, त्याच उद्देशासाठी वापरण्यात येईल व अन्य कोणत्याही उद्देशासाठी कर्ज "डायव्हर्ट केले जाणार नाही" किंवा "अन्य काही मिळवण्यासाठी वापरले जाणार नाही." जर कंपनीला कर्जदाराने निधीचा अन्यत्र वापर केल्याबद्दल किंवा इतर काही मिळवण्यासाठी ते वापरले असल्याबद्दल विशिष्ट प्रमाणपत्र प्राप्त करण्याची इच्छा असेल, तर कंपनीला ह्या उद्देशाने कर्जदाराच्या ऑडीटर्सना एक स्वतंत्र आदेश जारी करण्याचा अधिकार आहे. परंतु, जर कंपनीची इच्छा असेल तर कंपनीच्या निवडीचे कंपनीचे कर्मचारी/चार्टर्ड अकाउंटस/ऑडीटर्स ह्यांच्यापैकी कोणाद्वारे कर्जदाराच्या खात्यांचे ऑडीट हे कर्जदाराच्या खर्चासह करणे, हे कंपनीच्या अधिकारामध्ये येते. कर्जदार कंपनीचे कर्मचारी/चार्टर्ड अकाउंटस/ऑडीटर्स ह्यांना आपल्या कार्यालयांमध्ये/परिसरात येऊ देईल व सर्व नोंदी उपलब्ध करून देईल आणि वरील उद्देशासाठी त्यांना जी माहिती घेणे आवश्यक असेल, ती सर्व माहिती/नोंदी देईल.

:

**14. गॅरेंटरचे दायित्व:**

a. गॅरेंटर ह्याद्वारे कंपनीला हमी देत आहे की, ड्यु दिवशी कर्जदाराने इन्स्टॉलमेंटस पे केले नाही किंवा ह्या कर्ज करारामधील त्याच्या काही दायित्वाला पूर्ण केले नाही, तर गॅरेंटर हमी देत आहे की, तो स्वत:ला कंपनी सांगेल ती रक्कम मागणी केल्यावर भरण्यासाठी जवाबदार असेल व त्यामध्ये तो विवाद किंवा विरोध करणार नाही. परंतु, डिफॉल्ट घडल्यानंतर कंपनीद्वारे मागणी करण्यामध्ये अपयश आल्यास किंवा उशीर झाल्यास, त्यामुळे ह्या कर्ज करारामध्ये दिलेल्या गॅरेंटरच्या दायित्वापासून त्याची सुटका होणार नाही.

b. इथे दिलेले गॅरेंटरचे दायित्व कर्जदारासोबत सर्व थकित बाकी रकमांसाठी समान प्रकारे व्यापक असेल व त्यामध्ये इन्स्टॉलमेंटस, हप्ते, दंड शुल्क, अन्य शुल्क, फीस, खर्च  व ह्या कर्ज कराराच्या अंतर्गत कर्जदाराने कंपनीला देय असलेल्या अन्य कोणत्याही ड्युजचा समावेश असेल.

c. गॅरेंटरसहमत आहे की, त्याचे दायित्व हे प्राथमिक कर्तव्य पूर्ण करण्याचे असेल व तो केवळ हमी देणार नाही व कंपनीकडून कर्जदाराला देण्यात येणा-या कोणत्याही सुविधेमुळे किंवा वेळ उपलब्ध करून दिल्यामुळे किंवा ह्या कर्ज करारामधील वरील कर्जाच्या परतफेडीमध्ये किंवा कोणत्याही ड्युजच्या पेमेंटमध्ये कोणतीही सवलत किंवा मदत केल्या गेल्यामुळे किंवा निर्माण होणा-या प्रस्तावित कोणत्याही सुरक्षिततेच्या संदर्भात त्या हमीमध्ये त्रुटी उद्भवणार नाही किंवा ती काढून घेतली जाणार नाही. गॅरेंटर पुढे सहमत आहे की, देण्यात आलेली अशी कोणतीही सवलत, मदत, वेळ किंवा सुविधा ही योग्य त्या सूचनेनंतर आणि गॅरेंटरच्या सहमतीने दिली जाईल.

d. गॅरेंटरच्या विरोधातील कंपनीचे अधिकार पूर्ण लागू राहतील आणि कंपनी व अन्य गॅरेंटरमध्ये, असेल तर, कोणतीही व्यवस्था झाली तरी ते तसेच राहतील किंवा दुस-याच्या दायित्वाला समाप्त न करता कंपनीला गॅरेंटरने त्याचे इथे दिलेले दायित्व पूर्ण करणे आवश्यक ठरवण्याचे स्वातंत्र्य असेल व हे त्याच प्रमाणात असेल ज्या प्रमाणात वरील दायित्वे पूर्ण करण्यासाठी नेहमी मूळ गॅरेंटर संपूर्णपणे जवाबदार होता.

e. गॅरेंटर इथे सहमई देत आहे की, त्याच्या सहमतीशिवाय/मान्यतेशिवाय कर्जदार आणि कंपनीला ह्या कर्ज कराराच्या अटी व शर्तीमध्ये बदल, सुधारणा किंवा परिवर्तन करण्याचे स्वातंत्र्य असेल व विशेषत: कर्जाच्या परतफेडीमध्ये आणि/किंवा व्याज अदा करण्यामध्ये व कंपनीला कर्जदाराद्वारे अटी व शर्तीनुसार कंपनीला आवश्यक असेल त्यानुसार अन्य रकमा अदा करण्याचे, बदल करण्याचे, ती रद्द करण्याचे किंवा त्यामध्ये सुधारणा करण्याचे स्वातंत्र्य असेल व त्यासह ह्या कर्ज करारामध्ये दिलेल्या अटींसह व्याज दर वाढवण्याचेही स्वातंत्र्य असेल.

f. कंपनीला गॅरेंटरला सूचना न देता व कोणत्याही प्रकारे हमीवर परिणाम न होता कोणत्याही वेळी व कोणत्याही प्रकारे ह्या कर्ज कराराद्वारे कंपनीला मिळालेल्या अधिकारानुसार व क्षमतेनुसार कर्जदाराकडून कंपनीला ड्यु असलेल्या इन्स्टॉलमेंटस किंवा अन्य रकमांच्या पेमेंटला किंवा अन्य सुविधांना लागू करण्याचे किंवा ते रोखण्याचे स्वातंत्र्य असेल, कोणातेही कंपोजिशन करण्याचे किंवा कर्जदाराला अन्य कोणतीही सुविधा किंवा मदत किंवा वेळ देण्याचे स्वातंत्र्य असेल वर दिलेल्या विषयांच्या संदर्भात कंपनीच्या स्वातंत्र्यामुळे किंवा कंपनीने केलेल्या कायद्यानुसार सुरक्षेशी संबंधित असलेल्या कोणत्याही कृतीमुळे किंवा कोणत्याही कृतीच्या अभावामुळे गॅरेंटरचे दायित्व संपुष्टात येणार नाही. फक्त ह्या तरतुदीसाठी गॅरेंटरला दायित्वातून मुक्त करण्याचा परिणाम होईल व गॅरेंटर इथे ह्या हमीच्या कोणत्याही तरतुदींच्या संदर्भात आवश्यक तो परिणाम साध्य करणे आवश्यक असेल त्यानुसार कंपनीच्या हितामध्ये सर्व हमी व अन्य अधिकार सोडून देत आहे जे अन्यथा गॅरेंटरने अमलात आणणे आवश्यक झाले असते.

g. ही हमी गॅरेंटरच्या विरोधामध्ये अमलात आणता येऊ शकेल व गॅरेंटरच्या विरोधात ह्या हमीच्या अनुषंगाने कारवाई केली जाताना कर्जाच्या पेमेंटसाठी असलेल्या कोणत्याही सुरक्षेला त्यासाठी विचारात घेतले जाणार नाही व अशी सुरक्षा थकित किंवा प्राप्त न झालेली किंवा गमावलेली असू शकते.

h. गॅरेंटर सहमत आहे की, कंपनीच्या योग्य प्रकारे प्रमाणित केलेल्या अकाउंटसच्या विधानाची प्रत गॅरेंटरवर बंधनकारक असेल व ह्या करारानुसार त्या ड्यु रकमा देय होतील.

i. येथे दिलेले गॅरेंटरचे दायित्व कोणत्याही प्रकारे बॅंकरप्सीद्वारे किंवा कर्जदाराच्या बॅंकरप्सीच्या याचिका किंवा ठराव किंवा आदेशाला सादर केल्यामुळे, पारित केल्यामुळे किंवा कंपनीच्या किंवा कर्जदाराच्या संविधानातील बदलामुळे उद्‌भवल्यामुळे बदलणार नाही.

j. गॅरेंटर इथे सहमत आहे व घोषित करत आहे की, ही हमी सुरू असेपर्यंत ह्या कर्जाच्या व्यतिरिक्त अन्य पुढील कर्जे किंवा अन्य सुविधा घेण्यासाठी आणि/किंवा त्याच कर्जाला रिन्यु करण्यासाठी कर्जदार मुक्त असेल व ह्या स्थितीमध्ये इथे दिलेली हमी कोणत्याही प्रकारे प्रभावित किंवा बाधित होणार नाही, तर ती पूर्णत: लागू असेल व गॅरेंटरवर पूर्णत: प्रभावी असेल.

k. गॅरेंटर इथे सहमती देत आहे की, ह्या कर्ज कराराच्या अंतर्गत पेमेंट करणे आवश्यक होण्यासाठी कंपनीला आपले अधिकार वापरून होणे गरजेचे नाही किंवा कर्जदाराच्या विरोधात कारवाई करणे गरजेचे नाही, ह्यासाठी गॅरेंटर सहमती देत आहे.

l. ह्या कर्ज कराराच्या कोणत्याही तरतुदीच्या संदर्भात किंवा अन्य संबंधित कागदपत्राच्या तरतुदीच्या संदर्भात कंपनी व कर्जदारामध्ये विवाद प्रलंबित असूनही ह्या हमीमध्ये देय असलेले ड्युज कंपनी मागेल तेव्हा त्याचे पेमेंट करण्यासाठी गॅरेंटर सहमत आहे.

m. ही हमी सतत चालू राहणारी आहे व जोपर्यंत सर्व व्याज, दंड शुल्क, खर्च, चार्जेस व अन्य रकमा ज्या वेळोवेळी ड्यु होतील व ह्या कर्ज करारानुसार कंपनीला देणे बाकी असेल, त्या सर्व रकमेसह कर्जदार जोपर्यंत कर्ज संपूर्ण प्रकारे परत करत नाही, तोपर्यंत ही हमी लागू व प्रभावी राहील.

n. गॅरेंटर सहमत आहे की, ह्या कर्ज करारामध्ये काही दोष किंवा अवैध घटक आले असतील आणि/किंवा कागदपत्रे किंवा लेखन अपुरे असले तरीही ही हमी वैध व लागू राहील व ह्या हमीचे दायित्व पूर्ण केल्याशिवाय गॅरेंटरला ह्या दायित्वामधून मोकळे होता येणार नाही.

o. र्जदाराने कंपनीसोबत केलेल्या कोणात्याही पेमेंटद्वारे हमी अंशत: किंवा पूर्णत: समाप्त होणार नाही किंवा संपणार नाही व जोपर्यंत ह्या कर्ज करारामध्ये कंपनीला असलेल्या सर्व ड्युज रकमांची पूर्ण परतफेड होईपर्यंत गॅरेंटरवर ती हमी बंधनकारक असेल व लागू असेल.

p. ही हमी अपरिवर्तनीय असेल व पूर्णत: लागू व प्रभावी असेल. जरी कंपनीने अन्य व्यक्तिगत किंवा कॉरपोरेट हमी घेऊन कंपनीचे सर्व ड्युज मिळवले असतील ज्यामध्ये व्याजासह कर्जाची परतफेड असेल व कर्जदाराने अन्य सर्व ड्युज व खर्च ह्यांची परतफेड केली असेल. गॅरेंटरचे वारस, कार्यवाहक व प्रशासकांवर ही गॅरंटी बंधनकारक असेल.

**15. पूर्वसमाप्ती:**

a. आपल्या स्वयंनिर्णयानुसार व कंपनी निर्धारित करेल त्या अटींनुसार कर्जदाराच्या विनंतीनुसार कंपनी कर्जाच्या इन्स्टॉलमेंटसना वेगाने भरण्यासाठी किंवा पूर्वसमाप्तीसाठी मान्यता देऊ शकेल.

b. पूर्वसमाप्ती करण्याच्या कर्जदाराच्या इच्छेच्या कमीत कमी 21 (एकवीस) दिवस आधी कर्जदार कंपनीला लिखित सूचना देऊन संपूर्ण थकित कर्ज रकमेला अदा करून व कर्जातील थकित मुद्दल रक्कम, बाकी इन्स्टॉलमेंटस, व्याज, दंड शुल्क व ह्या कर्ज करारानुसार कर्जदाराद्वारे कंपनीला देय असलेल्या अन्य सर्व रकमांना अदा करून पूर्वसमाप्ती करू शकतो. वेळापत्रकात नमूद केलेल्या कालावधीपूर्वी प्री-क्लोजर करता येणार नाही.

c. ह्या कर्ज कराराच्या अनुसूचीमध्ये निर्धारित शुल्कानुसार किंवा कंपनीने निर्णय घेतल्यानुसार ठरलेल्या दराप्रमाणे पूर्व समाप्तीसाठी फीस लागू होईल.

d. ह्या विधानामध्ये दिलेली पूर्वसमाप्ती रक्कम खात्याच्या विधानामध्ये चेक्स/आदेशांची पूर्तता होण्यावर अवलंबून आहे व त्यामध्ये मानले गेले आहे की, कर्ज करारामधील सर्व पेमेंटस पूर्ण झाले आहेत. असे जर झाले नाही तर हे रिव्हर्स केले जाईल व चेक/आदेश फेटाळण्याचे शुल्क, दंड शुल्क व अन्य लागू शुल्कांसह हे देय ठरेल.

**16. दंड शुल्क:**

**ह्या कर्ज करारामध्ये असलेल्या अन्य कोणत्याही अधिकारांना समाप्त करण्याच्या कंपनीच्या अधिकारांना कोणतीही बाधा न येता, इन्स्टॉलमेंटच्या पेमेंटमध्ये काही विलंब झाल्यास/ड्यु दिवसापासून वास्तविक पूर्ण पेमेंटपर्यंत काही अन्य थकित रक्कम असल्यास व कंपनीचे अशा डिफॉल्ट रकमेबद्दल समाधान होईपर्यंत कर्जदार/गॅरेंटर कंपनीला येथील अनुसूचीमध्ये दिल्याप्रमाणे डिफॉल्टप्रमाणे दंड शुल्क अदा करेल ("दंड शुल्क").**

**17. नियुक्ती व सुरक्षा निश्चिती:**

a. हा कर्ज करार कर्जदार व गॅरेंटर ह्यांचा व्यक्तिगत स्वरूपाचा आहे. कर्जदार किंवा गॅरेंटर ह्यांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रकारे ह्या कर्ज करारामधील आपले कोणतेही अधिकार किंवा दायित्व किंवा लाभ कंपनीच्या लिखित पूर्व अनुमतीशिवाय दुस-या व्यक्तीला हस्तांतरित करण्याचा अधिकार नाही.

b. ह्या कर्ज करारामध्ये अधिकार, लाभ, दायित्व, कर्तव्ये, जवाबदा-यांसह कंपनीला असलेले पूर्ण अधिकार व अधिकार क्षमता किंवा त्यापैकी कोणताही अधिकार इतरांना देण्याचा, सुरक्षित करण्याचा, विकण्याचा, नियुक्त करण्याचा किंवा हस्तांतरित करण्याचा संपूर्ण अधिकार असेल व त्यामध्ये कर्जदार/गॅरेंटरला सूचना न देता विक्री, हस्तांतरण, जमानत घेणे, इतर व्यक्तीच्या नावे करणे किंवा अन्य प्रकारे इतर व्यक्ती किंवा संस्थेला देऊन इन्स्टॉलमेंट व कर्जातील शिल्लक प्राप्त करण्याचा अधिकार आहे व अशी कोणतीही विक्री, नियुक्ती किंवा हस्तांतरण हे कर्जदार/गॅरेंटरवर पूर्णत: बंधनकारक असेल व ह्या कर्ज करारामधील आपले दायित्व गॅरेंटर अशा नियुक्त व्यक्तीसाठी पूर्ण करेल. कर्जदार स्पष्ट प्रकारे मान्य करत आहे व स्वीकारत आहे की, कंपनीला आपले अधिकार व हितसंबंध पूर्णत: किंवा अंशत: कोणत्याही प्रकारे विकण्याचा, नियुक्त करण्याचा किंवा हस्तांतरित करण्याचा पूर्ण अधिकार व अधिकार क्षमता आहे व त्याच्या अटी कंपनी ठरवू शकेल व कंपनीने निवडलेला कोणताही तिसरा पक्ष असलेल्या खरेदी करणा-याच्या, नियुक्त होणा-या किंवा हस्तांतर करणा-याच्या वतीने कर्जदाराच्या विरोधात असलेल्या येथे दिलेल्या अधिकारांना सुरक्षित ठेवण्याचा अधिकारसुद्धा कंपनीला असेल व ह्याची माहिती किंवा लिखित सूचना कर्जदाराला देण्याची गरज नसेल.

c. कर्जदार इथे कंपनीला कर्जदाराच्या जोखमीसह व खर्चासह कर्जदाराने त्याच्याशी संबंधित दिलेले तथ्य किंवा माहितीची पडताळणी करण्यासाठी एक किंव अधिक व्यक्तींना सहभागी करण्यासाठी आणि/किंवा कर्जदाराच्या थकित रकमेला/जामीन रकमेला प्राप्त करण्याचा व ह्या संदर्भात कंपनीला जे योग्य वाटेल अशी माहिती, कागदपत्रे, तथ्ये व आकडे देण्याचा व अशा व्यक्तीला खर्च देण्याचा अधिकार देत आहे व कर्जदार ह्यासाठी सहमत आहे.

**18. धारणा अधिकार आणि सेट- ऑफ:**

a. कंपनीसोबत असलेल्या कोणत्याही खात्यामध्ये असलेल्या कर्जदाराच्या/गॅरेंटरच्या सर्व रकमांवर कंपनीला धारणा अधिकार व सेट-ऑफ करण्याचा अधिकार असेल. जर कंपनीने मागणी केल्यानंतर कर्ज खात्यामध्ये असलेल्या शिलकीची निर्धारित कालमर्यादेमध्ये परतफेड न केल्यास कर्जदार/गॅरेंटरच्या कोणत्याही खात्यामध्ये जमा असलेली अशी शिल्लक कर्ज खात्यामधील ड्युजसाठी एडजस्ट केली जाईल. त्यामध्ये काही कमतरता असेल, तर कमी असलेली रक्कम कंपनी कर्जदार/गॅरेंटरकडून वसूल करू शकेल. कंपनीकडून घेतलेल्या कोणत्याही सुविधेच्या अंतर्गत कर्जदार/गॅरेंटरसोबत ह्या कर्जाच्या आणि/किंवा इतर झालेल्या कोणत्याही करारांच्या अंतर्गत जर डिफॉल्ट होण्याची स्थिती पुढे सुरू राहिली तर कंपनीला एनओसी/फॉर्म- 35, मूळ अधिकारपत्रे/कागदपत्रे, नो ड्यु पत्र हे स्थगित ठेवण्याचा/जारी करण्यापासून रोखण्याचा आणि वाहन आणि/किंवा अन्य जामीन असलेल्या कर्जासंदर्भात कर्जदाराने गहाण ठेवलेल्या/हायपोथिकेट केलेल्या संसाधनांशी संबंधित गहाण मालमत्तेला रोखून ठेवण्याचा अधिकार असेल. त्यानुसार, इथे कर्जदार/गॅरेंटर सहमत आहेत व मान्य करत आहेत की, कर्जदार/गॅरेंटरद्वारे केलेल्या सर्व करारांमधील सर्व स्थगित/ड्यु रकमा/शुल्क ह्यांची पूर्ण व अंतिम परतफेड झाल्यानंतरच त्यांना एनओसी/फॉर्म- 35, अधिकारपत्रे/कागदपत्रे व नो ड्युज पत्र व वरील गहाणखत काढल्याचे प्रमाणपत्र मिळण्याचा अधिकार असेल.

b. कर्जदार/गॅरेंटरद्वारे कोणतेही सेट- ऑफ केले जाणार नाही किंवा विरोधी दावा केला जाणार नाही आणि कर्जदार/गॅरेंटरद्वारे ह्या कर्ज कराराअंतर्गत करण्यात आलेल्या सर्व पेमेंटस ह्या सेट- ऑफसिवाय किंवा हमीशिवाय किंवा त्यापैकी कोणतेही किंवा कायद्याअंतर्गत असलेल्या दाव्याशिवाय केल्या असतील.

**19. भरपाई:**

कर्जदार/गॅरेंटरद्वारे कंपनीला देण्यात येणा-या कोणत्याही चुकीच्या किंवा दिशाभूल करणा-या माहितीमुळे कंपनीला होऊ शकणा-या/झालेल्या हानीपासून, त्रासापासून, सर्व कृतींपासून, दावे, प्रक्रिया व सर्व खर्च, शुल्क, विम्याचे शुल्क व नुकसान ह्यापासून आणि येथील कोणत्याही अटी, शर्ती, सहमती व तरतुदींच्या संदर्भात कर्जदार/गॅरेंटरद्वारे कोणतेही उल्लंघन/डिफॉल्ट/पालनाचा अभाव/पूर्ततेची कमतरता ह्यामुळे झालेल्या नुकसानापासून मुक्त ठेवेल आणि कंपनीला नुकसान भरपाई देईल. ह्या कर्ज कराराचा विषय असल्यामुळे ह्या विधानानुसार ड्युज म्हणून कोणतीही देय रक्कम समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्याचा अधिकार कंपनीला आहे.

**20. सूचना:**

ह्यासंदर्भातील कोणतीही सूचना योग्य प्रकारे पाठवण्यात आली व देण्यात आली असे तेव्हा समजले जाईल जेव्हा ती ह्या कर्ज करारामध्ये दिलेल्या कर्जदाराच्या/गॅरेंटरच्या पत्त्यावर पोस्टाने/कुरियरने/टेलिग्रामने/फॅसिमिल परिवहनाद्वारे/ई- मेलद्वारे पाठवली जाईल किंवा कर्जदार/गॅरेंटरला अन्य इलेक्ट्रॉनिक प्रकारे कळवली जाईल व ईमेल/अन्य इलेक्ट्रॉनिक पद्धतींने पाठवण्यात येणा-या सूचना वगळता अन्य सूचना पोस्ट केल्याच्या दुस-या कार्य दिवशी किंवा प्राप्त होण्याच्या वास्तविक दिवशी मिळाली (जे लवकर असेल ते), असे मानले जाईल. जर सूचना ई-मेल किंवा अन्य इलेक्ट्रॉनिक प्रकारे पाठवली गेली असेल, तर जेव्हा अशी सूचना वाचली गेल्याची संबंधित पावती मिळेल, तेव्हा ही सूचना पोहचली असे मानले जाईल किंवा जर कंपनीने वाचली जाण्याची पावतीची विनंती केली नसेल, तेव्हा ती पाठवण्याच्या वेळी पोहचली, असे मानले जाईल.

**21. खर्च व व्यय:**

a. ह्या कर्ज कराराशी संबंधित सर्व खर्च (वकिल शुल्कासह), शुल्क, खर्च, कर, अधिभार (मुद्रांक शुल्कासह) हा कर्जदार व गॅरेंटरद्वारे केला जाईल व त्याचे वहन केले जाईल. कंपनीला इन्स्टॉलमेंटस संकलित करण्यामध्ये किंवा करण्याच्या प्रयत्नामध्ये झालेला कोणताही खर्च व ह्या संकलनासंदर्भात कायदेशीर प्रक्रिया किंवा प्रतिनिधित्वाचा खर्च झाल्यास अशी अन्य रक्कम अदा करण्यासाठी कर्जदार व गॅरेंटर हे जवाबदार असतील.

b. कंपनीकडून मागणीची सूचना आल्यापासून 3 दिवसांच्या आत कर्जदार/गॅरेंटर देण्यात आलेल्या सर्व रकमांना किंवा झालेल्या खर्चाला रिइंबर्स करेल. वरील रकमांवर रक्कम पे केल्याच्या दिवसापासून रिइंबर्समेंट होण्याच्या दिनांकापर्यंत दंड शुल्क लागू होईल.

**22. माफी (वेव्हर):**

ह्या कर्ज करारानुसार किंवा अन्य कोणत्याही करारानुसार किंवा कागदपत्रानुसार किंवा कंपनीने दिलेल्या कोणत्याही सवलतीमुळे कोणताही अधिकार, अधिकार क्षमता किंवा उपाय करण्यामध्ये कंपनीला उशीर होत असेल किंवा ती ते करणे टाळत असेल, तर कंपनीच्या कोणत्याही अशा अधिकारावर, अधिकार क्षमतेवर किंवा उपाय करण्यावर बाधा येणार नाही व ह्या बाबीला त्यासंदर्भातील माफी म्हणून बघितले जाऊ नये

किंवा डिफॉल्टची मान्यता म्हणून बघितले जाऊ नये किंवा कोणत्याही डिफॉल्टच्या संदर्भात कंपनीची कार्यवाही किंवा कार्यवाहीचा अभाव किंवा डिफॉल्टला दिलेली मान्यता म्हणून बघितले जाऊ नये व त्यामुळे अन्य कोणत्याही डिफॉल्टच्या संदर्भात कंपनीच्या कोणत्याही अधिकार, अधिकार सामर्थ्य किंवा उपायावर कोणतीही बाधा येणार नाही किंवा त्यामध्ये घट होणार नाही.

**23. बंधनकारक अनुपालन:**

जर ह्या कर्ज करारामध्ये दिलेली एक किंवा अधिक तरतुदी अवैध किंवा अनुपालन करण्यासारख्या नसल्याचे आढळले, तर हे मान्य केले जात आहे की, त्या स्थितीत बाकीच्या कर्ज कराराची अंमलबजावणी कायद्याने अनुमती असेल त्या प्रमाणात केली जाईल व अवैध किंवा अनुपालन योग्य नसलेल्या अधिकार किंवा तरतुदी पक्षांना इच्छा असेल त्या प्रमाणात झाल्याचे मानले जाईल.

**24. कर्ज माहिती**

कर्जदार/गॅरेंटर इथे सहमत आहेत व मान्यता देत आहेत की, ते कंपनीला पुढील सर्व प्रकारची माहिती उघड करतील:

i. कर्जदार/गॅरेंटरशी संबंधित माहिती व तथ्ये.

ii. कर्जदार/गॅरेंटरने घेतलेल्या कोणात्याही कर्ज सुविधेशी संबंधित माहिती किंवा तथ्ये आणि

iii. कर्जदार/गॅरेंटरने ह्या दायित्वाच्या पूर्ततेमध्ये कुचराई (डिफॉल्ट) केली असल्यास त्याची माहिती जी कंपनीला योग्य वाटू शकेल व उघड करणे आवश्यक असेल व ही माहिती कोणत्याही लागू कायद्यानुसार आरबीआयने ह्या संदर्भात अधिकृत केलेल्या क्रेडीट माहिती कंपन्यांना व एजन्सीजना देणे आवश्यक असू शकेल.

(b) कर्जदार/गॅरेंटर मान्य करत आहेत की, अशा क्रेडीट माहिती कंपन्या/एजन्सीज ह्यांना पुढील बाबींची अधिकृत अनुमती असेल.

i त्यांना योग्य वाटेल अशा प्रकारे कंपनीने उघड केलेल्या माहितीवर प्रक्रिया करणे व ती वापरणे आणि प्रक्रिया केलेली माहिती व तथ्ये किंवा त्यांनी तयार केलेली उत्पादने बँका/आर्थिक संस्था व अन्य क्रेडीट मान्यता देणारे किंवा नोंदणीकृत युजर्स ह्यांना ह्या संदर्भात भारतीय रिजर्व बँकेने प्रमाणित केल्यानुसार विचारार्थ सादर करणे. कर्जदार/गॅरेंटर आणखी सहमत आहेत व मान्यता देत आहेत की, कंपनी तिला योग्य वाटेल त्यानुसार कर्जदार/गॅरेंटरची काही किंवा सर्व माहिती ग्रूप कंपन्या, शाखा किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला देऊ शकते.

**25. संकीर्ण:**

a. ाकंपनीला अटी किंवा शर्तीमध्ये (ह्या कर्ज करारामधील व्याज दर, दंड शुल्क, पूर्वसमाप्तीसाठी लागू दर व अन्य लावण्यात येणारे शुल्क ह्यासह) कोणतेही आगामी बदल, सुधारणा किंवा पुनर्रचना करण्याचा अधिकार असेल व ह्या बदलांबद्दल कंपनि तिला योग्य वाटेल अशा प्रकारे अटी व शर्तीमधील कोणत्याही बदलाची माहिती ती कर्जदाराला देईल.

b. कर्जदार/गॅरेंटरच्या पत्त्यामधील कोणत्याही बदलाची माहिती कंपनीला असा बदल झाल्यापासून 4 दिवसांच्या आत लिखित प्रकारे दिली जाईल.

c. ह्या कर्ज कराराचे नियमन व पालन भारताच्या कायद्यांच्या अंतर्गत होईल.

d. जर दोन किंवा अधिक कर्जदार असतील, तर ह्या कर्ज करारामधील त्यांचे दायित्व हे संयुक्त व एकत्र असेल.

e. सर्व पत्र व्यवहारामध्ये कर्ज करार क्रमांक कर्जदाराने/गॅरेंटरने कळवणे गरजेचे आहे.

f. कर्ज करारामध्ये संदर्भामध्ये वेगळा अर्थ अपेक्षित असल्याशिवाय पुढील अर्थ घेतला जाईल:

i. एक वचनामध्ये बहुवचन आहे व बहुवचनात एक वचन आहे.

ii. व्यक्तीवाचक शब्दांमध्ये व्यक्ती, मंडळ, कंपनी, भागीदारी तत्त्वावरील फर्म, विश्वस्त न्यास किंवा अन्य कोणतीही संस्था समाविष्ट असेल.

Iii. शीर्षके ही फक्त संदर्भासाठी आहेत.

g. कर्जदार इथे सहमत आहे व प्रमाणित करत आहे की, कंपनीला आपली अन्य उत्पादने व सेवा (जसे विमा) ह्यांची व आपल्या सहकारी कंपन्यांची उत्पादने व सेवा ह्या कर्जासह अर्जदाराला विकण्याचा अधिकार आहे.

h. ह्या कर्ज कराराच्या अवधीमध्ये जर कर्जदार/गॅरेंटर हे भागीदारी तत्त्वावरील फर्म/कंपनी/हिंदु अविभक्त कुटुंब असेल, तर कर्जदार/गॅरेंटरच्या संदर्भात बदल होणार नाही व त्यांच्या दायित्वामध्ये बदल होणार नाही किंवा ते संपणार नाही.

**26. लवाद:**

(a) ह्या कराराशी संबंधित त्याच्या अवधीमध्ये किंवा अवधी संपल्यानंतर येऊ शकणारे सर्व विवाद, मतभेद आणि/किंवा दावे ह्यांचा निवाडा लवादाद्वारे आरबिटरेशन अँड काउंसिलिएशन अधिनियम, 1996 ("अधिनियम") ह्यानुसार केला जाईल किंवा त्यामधील अशा कोणत्याही बंधनकारक सुधरणांद्वारे केला जाईल ज्यांची माहिती लवादाच्या विवादाच्या पूर्वी दिली गेलेली असेल व अशा विवादाला सुरूवात करणा-या कोणालाही पुढील तटस्थ लवाद संस्थांकडून (ज्यांना इथून पुढे "लवाद संस्था" म्हंटले जाईल) लवाद नेमला जाणे गरजेचे व अशा विवाद, मतभेद आणि/किंवा दाव्यांवर समाधान करण्याची प्रक्रिया व्हावी लागेल:

i प्रीसॉल्व्ह360, हा एक ऑनलाईन विवाद निवारण माध्यम/संस्था आहे व ती एजक्राफ्ट सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड द्वारे चालवली जाते व सध्या त्यांचे कार्यालय तिसरा मजला, चर्चगेट, घर क्र. 32, वीर नरीमन रोड, फोर्ट, मुंबई- 400 023 येथे आहे (भविष्यात बदल होऊ शकतो). किंवा (ii) एडीआरईएस नाऊ, हा एक ऑनलाईन विवाद निवारण मंच/संस्था आहे व सध्या ती एडीआर ई- सर्वन्त्र प्रायव्हेट लिमिटेडद्वारे चालवली जाते व तिचे कार्यालय 63, पॅलेस रोड, वसंतनगर, बंगलोर- 560 052 येथे आहे (भविष्यात बदल होऊ शकतो). किंवा (iii) काउंसिल फॉर इंडियन अँड इंटरनॅशनल आरबिटरेशन हा येथे कार्यालय असलेला विश्वस्त न्यास- क्र. 6, एम. टी. एच रस्ता, डीएबीसी कॉम्प्लेक्स, तिसरा मजला, विल्लीवक्कम, चेन्नै- 600 049. (भविष्यात बदल होऊ शकतो).

लवाद संस्था विवाद, मतभेद आणि/किंवा दावे ह्यांना लवादाच्या सदस्याकडे पाठवतील. लवाद संस्थेद्वारे लवाद करणा-या व्यक्तीची नियुक्ती ही ह्या करारातील पक्षांच्या परस्पर सहमतीने केलेली संयुक्त नियुक्ती मानली जाईल. अशा लवादाने दिलेला निर्णय ह्या करारातील सर्व पक्षांवर अंतिम व बंधनकारक असेल.

(b)लवाद करणारी संस्था पुढील स्थितीमध्ये नियुक्त लवादाच्या जागी पर्यायी लवाद करणा-या व्यक्तीची नियुक्ती करेल: i. नियुक्त लवादाचा मृत्यु; किंवा ii. जेव्हा नियुक्त लवाद सदस्य कोणत्याही कारणाने काम करण्यासाठी सक्षम नसेल किंवा काम करू इच्छित नसेल.

(c) लवादाची प्रक्रिया चेन्नई किंवा कोलकाता येथे असेल. ह्या कराराशी संबंधित सर्व विवाद व फरक आणि/किंवा दावे ह्यांवर विचार करण्याचा व त्यावर कार्यवाही करण्याचा संपूर्ण न्याय अधिकार किंवा कोलकातामधील न्यायालयांना असेल. लवादाच्या प्रक्रियेची भाषा इंग्रजी असेल.

(d) आवश्यक असेल तर लवादाच्या प्रक्रियेच्या कार्यवाहीच्या संचालनासाठीचे प्रशासकीय सहकार्य हे लवाद संस्थेद्वारे दिले जाऊ शकेल.

(e) ह्याद्वारे पक्ष लिखित याचिका/प्रस्तुती, प्रत्यक्ष कागदपत्रे किंवा अन्य कोणत्याही इलेक्ट्रॉनिक/व्हर्च्युअल प्रकारे (टपाल पाठवून, ई-मेल किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या व्हिडिओ कॉन्फरन्स (व्हीसी) सह अन्य कोणत्याही प्रकारे, ऑनलाईन, व्हर्च्युअल सुनावणी इ. द्वारे किंवा आवश्यक झाल्यास बाह्य एप्लिकेशन वापरून) करण्यात येणा-या लवादाच्या प्रक्रियांना किंवा लवादाला ठीक वाटेल त्या प्रकारे त्यांच्या मिश्र वापराला सहमती देत आहेत व लवादाचा निर्णय पक्षांसाठी अंतिम व बंधनकारक असेल.

(f) लवाद करणारी व्यक्ती त्याच्याद्वारे/तिच्याद्वारे पारित केलेल्या निर्णयाची/अंतरिम निर्णयाची/आदेशाची योग्य प्रकारे प्रमाणित केलेली प्रत पोस्टाने/कुरियरने किंवा अशा निर्णयाची स्कॅन केलेली इमेज किंवा इलेक्ट्रॉनिक/डिजिटल प्रकारे स्वाक्षरी केलेली इमेज पक्षांना ई-मेल किंवा अन्य कोणत्याही इलेक्ट्रॉनिक पद्धतीने त्याला ठीक वाटेल अशा प्रकारे स्वतःकडून किंवा लवाद संस्थेकडून पाठवेल व ह्या अधिनियमाच्या उद्देशासाठी तिला स्वाक्षरी केलेली प्रत मानले जाईल.

(g) कर्जदार/गॅरेंटरने ह्या कराराच्या अंतर्गत कंपनीला दिलेला पोस्टल/ई- मेल आयडी आणि/किंवा अन्य कोणत्याही इलेक्ट्रॉनिक पद्धतीचा पत्ता किंवा कंपनीसोबत कर्जदार/गॅरेंटरने केलेल्या/दिलेल्या अन्य कोणत्याही कागदपत्रातील पत्ता हा सक्रिय पोस्टल/ई-मेल आणि/अन्य कोणताही इलेक्ट्रॉनिक पद्धतीचा पत्ता मानला जाईल व अशा सक्रिय पोस्टल/ई-मेल आणि/किंवा अन्य कोणत्याही इलेक्ट्रॉनिक पद्धतीच्या पत्त्यावर पाठवलेली सेवा ही पूर्ण झाली, असे मानले जाईल. पोस्टल/ई- मेल आणि/किंवा अन्य इलेक्ट्रॉनिक पद्धतीच्या पत्त्यातील कोणताही बदल किंवा अन्य कमतरता ह्याविषयी तत्काळ कंपनीला माहिती दिली जाईल.

**27. तक्रार निवारण प्रणाली:**

कंपनीने आरबीआयच्या प्रचलित मार्गदर्शक सूचनांनुसार एक सविस्तर तक्रार यंत्रणा निश्चित केली आहे. तक्रार निवारण प्रणाली व संपर्क तपशील इथे उपलब्ध आहेत- https://cholamandalam.com/grievance-redressal.aspx. कर्जदाराला त्याच्या/तिच्या तक्रारीचे निवारण वरील तक्रार निवारण प्रणालीकडून मिळू शकेल.

**28. इलेक्ट्रॉनिक/डिजिटल कार्यवाही आणि संपर्क:**

कर्जदार आणि गॅरेंटर येथे समजून घेत आहेत, सहमत आहेत, स्वीकार करत आहेत आणि प्रमाणित करत आहेत की, ते कोणत्याही इलेक्ट्रॉनिक/डिजिटल प्रकारे (लागू असेल तेव्हा) डिजिटल/इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी जोडून किंवा त्यांच्या सांगितलेल्या मोबाईल क्रमांकावर किंवा ई-मेल आयडीवर दिलेल्या वन टाईम पासवर्ड (ओटीपी) आणि/ई- लिंकवर दिलेल्या लिंकवर किंवा अन्य कोणत्याही प्रकारे दिलेल्या "मी स्वीकारतो/मान्य करतो" बटनवर क्लिक करून ह्या करारावर कार्यवाही करू शकतात व हा करार त्यानंतर पक्षांसाठी बंधनकारक ठरेल.

कर्जदार व गॅरेंटरना जाणीव आहे की, ह्या कर्ज कराराचे, त्यातील अटी व शर्ती, सूचना, स्वीकृत्या व संपर्कांचे ('कम्युनिकेशन्स') इलेक्ट्रॉनिक पद्धतीने म्हणजे ई-मेल, फॅसिमिल, एसएमएस टेक्स्ट मॅसेजिंग, ऑनलाईन/वेबसाईट स्वीकृती इ. (इलेक्ट्रॉनिक माध्यम') द्वारे कळवताना त्यामध्ये फसवणुकीची शक्यता असलेले बदल व अयोग्य प्रकारे ते कळवले जाण्याची घटना घडू शकते व त्यामध्ये डेटा संरक्षण व गोपनीयतेचा अभाव असू शकतो.

परंतु, जर कर्जदार/गॅरेंटर ह्यांना कंपनीला ह्या कर्ज कराराच्या अंतर्गत कर्जासंदर्भातील विविध घटकांबद्दल इलेक्ट्रॉनिक पद्धतीने विविध उद्देशांसाठी व कराराच्या संचालनासंदर्भात माहिती देण्याची आणि प्राप्त करण्याची इच्छा आहे.

कंपनीला त्याची अनुमती देताना कर्जदार/गॅरेंटर इथे अपरिवर्तनीय प्रकारे प्रमाणित करत आहेत, कंपनीला पुढील गोष्टींची खात्री देत आहेत व घोषित करत आहेत:

1. त्यांच्या आवश्यकतांसाठी कंपनी ही इलेक्ट्रॉनिक मीडियाद्वारे मिळालेल्या माहितीचा वापर करण्यासाठी विसंबून राहू शकेल (व ती माहिती विश्वसनीय आहे, असे मानेल). कोणत्या सूचना पाठवल्या गेल्या किंवा मिळाल्या ह्या संदर्भात काही प्रश्न असल्यास कंपनीला मिळालेल्या इलेक्ट्रॉनिक मीडीयामधील नोंदींना अंतिम, निर्णायक व बंधनकारक मानले जाईल व ह्या संदर्भात कोणत्याही पडताळणीची जवाबदारी कंपनीवर नसेल.

2. कर्जदार/गॅरेंटर प्रमाणित करत आहे की, कळवण्यात आलेल्या सूचनांच्या संदर्भात त्यामधील पूर्ण किंवा काही भागांच्या संदर्भात काम करण्यासाठी कंपनी बाध्य नसेल आणि हे कर्जदार/गॅरेंटरच्या जोखमीवर अवलंबून असेल.

3. इलेक्ट्रॉनिक पद्धतीने कळवण्यात आल्यावर कंपनीने केलेल्या कोणत्याही कृतीच्या किंवा कोणतीही कृती न करण्याच्या किंवा टाळण्याच्या किंवा त्यात बदल करण्याच्या कंपनीच्या कृतीसाठी कंपनीला जवाबदार धरले जाणार नाही.

4. कर्जदार व गॅरेंटर ह्यांना माहिती आहे व ते प्रमाणित करत आहेत की, फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने करण्यात येणा-या कोणत्याही सूचनेसाठी कंपनी सहमत आहे व ह्या विधानामधील घोषणेवर त्यासाठी अवलंबून आहे.

**29. स्वीकृती.**

कर्जदार व गॅरेंटर इथे घोषित करत आहेत की: त्यांनी अनुसूचीमध्ये दिलेल्या घटकांसह संपूर्ण कर्ज करार वाचला आहे, तो त्यांच्या उपस्थितीमध्ये भरला आहे, सर्व विधाने/तपशीलांमधील संपूर्ण अर्थ त्यांनी समजून घेतला आहे व ते त्याचे पालन करण्यासाठी बाध्य आहेत. वरील सुविधा घेण्यासाठी त्यांनी आवश्यक कागदपत्रांवर कार्यवाही केली आहे.

ते सहमत आहेत की, ज्या दिवशी ह्या कर्ज करारावर कंपनीमधील अधिकृत स्वाक्षरीकर्ते स्वाक्षरी करतील, त्या दिवशी हा कर्ज करार कायद्याने बंधनकारक ठरेल.

ह्या अनुसूचीमध्ये दिल्याप्रमाणे ह्या वर्षातील ह्या महिन्यातील ह्या दिवशी पक्षांनी ह्या कर्ज करारावर स्वाक्षरी केली आहे.

स्वाक्षरी केली व सादर केले.

नाव दिलेल्या व्यक्तींनी

चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी कंपनी लिमिटेड

अधिकृत स्वाक्षरीकर्ते

नाव दिलेल्या व्यक्तींनी स्वाक्षरी केली व सादर केले.

कर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

स्वाक्षरी केली व सादर केले.

नाव दिलेल्या व्यक्तींनी

सह कर्जदार 1 चे नाव व स्वाक्षरी

स्वाक्षरी केली व सादर केले.

नाव दिलेल्या व्यक्तींनी

सह कर्जदार 2 चे नाव व स्वाक्षरी

स्वाक्षरी केली व सादर केले.

नाव दिलेल्या व्यक्तींनी

सह कर्जदार 3 चे नाव व स्वाक्षरी

स्वाक्षरी केली व सादर केले.

नाव दिलेल्या व्यक्तींनी

सह कर्जदार 4 चे नाव व स्वाक्षरी

स्वाक्षरी केली व सादर केले.

नाव दिलेल्या व्यक्तींनी

सह कर्जदार 5 चे नाव व स्वाक्षरी

स्वाक्षरी केली व सादर केले.

नाव दिलेल्या व्यक्तींनी

गॅरेंटरचे नाव व स्वाक्षरी

वेळापत्रक

| कर्ज कराराचा दिनांक: | | | |
|---|---|---|---|
| कर्ज अर्ज क्र.: | | | |
| अ क्र. | कर्जदार/गॅरेंटरचा प्रकार | नाव | पत्ता |
| 1 | कर्जदार | | |
| 2 | सह कर्जदार 1 | | |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | सह कर्जदार 2 | | |
| 4 | सह कर्जदार 3 | | |
| 5 | सह कर्जदार 4 | | |
| 6 | सह कर्जदार 5 | | |
| 7 | गॅरेंटर | | |

| अ क्र. | कर्जदार/गॅरेंटरचा प्रकार | ईमेल पत्ता | मोबाइल क्र.: | व्यवसाय/उद्योगाचे स्थान | स्थिती (व्यक्तिगत/व्यक्तिगत प्रोप्रायटरी/कंपनी/भागीदारी) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | कर्जदार | | | | |
| 2 | सह कर्जदार 1 | | | | |
| 3 | सह कर्जदार 2 | | | | |
| 4 | सह कर्जदार 3 | | | | |
| 5 | सह कर्जदार 4 | | | | |
| 6 | सह कर्जदार 5 | | | | |
| 7 | गॅरेंटर | | | | |

| | |
|---|---|
| कर्जाचा हेतु: | |
| कर्ज उत्पादन | |
| कर्ज रक्कम | |
| कर्जाची मुदत | |
| व्याजाचा प्रकार | स्थिर |
| व्याजाचा दर | प्रति वर्षी % |
| परतफेड वेळापत्रक*<br>(a) प्रत्येक इन्स्टॉलमेंटची रक्कम | |
| (b) इन्स्टॉलमेंटची संख्या | |
| (c) पहिली इन्स्टॉलमेंट ________ रोजी किंवा त्या आधी पे केली जाईल व त्यानंतरच्या इन्स्टॉलमेंटस पुढील प्रत्येक महिन्याच्या 5 रोजी किंवा त्या आधी पे केल्या जातील. | स्वागत पत्राद्वारे किंवा कंपनीने निर्णय घेतलेल्या अन्य प्रकारे कळवले जाईल. |
| परतफेडीची वारंवारता | मासिक इन्स्टॉलमेंटसमध्ये |
| **दंड शुल्क** | **ड्यु दिवसापासून ते वास्तविक पेमेंटच्या दिवसापर्यंत डिफॉल्ट रकमेवर प्रति वर्ष 30% वार्षिक दराने.** |
| डॉक्युमेंट/डुप्लिकेट डॉक्युमेंट शुल्क:<br>i. फिजिकल खाते विधान शुल्क | Rs.250/-<br>Rs.1000/- |

| | | |
|---|---|---|
| ii. डुप्लिकेट एनओसी<br>Iii. फिजिकल परतफेड<br>वेळापत्रक | Rs.500/- | |
| चेक/मँडेट स्वॅप शुल्क | Rs.500/- | |
| सोर्सिंग फी- प्रशासकीय व प्रक्रिया शुल्क (पी. एफ.) | एस. एफ. | कर्ज रकमेच्य |
| चेक/आदेश फेटाळला गेल्याचे शुल्क | Rs.1000/- | |
| आदेश फेटाळला गेल्याचे शुल्क | Rs.500/- | |
| कायदेशीर शुल्क | वास्तविक वर + जी एसटी | |
| प्रीक्लोजर अट (पूर्ण बंद) | देय तारखेला सहा हप्ते भरेपर्यंत कोणत्याही प्रकारची प्रीक्लोजर परवानगी नाही | |
| प्रीक्लोजर अट (पूर्ण क्लोजर) | a. 7व्या ते 12व्या हप्त्यांपर्यंतच्या प्रीक्लोजरसाठी थकबाकी असलेल्या मुद्दलावर 6% + जीएसटी लागू होईल.<br>b. 12वी किस्त नियत तारखेला भरल्यानंतर प्रीक्लोजर केल्यास बकाया मूळ रकमेवर 4% + जीएसटी आकारले जाईल | |
| नियामक व बंधनकारक फीस- मुद्रांक शुल्क. | | |

सूचना: 1. वरील सर्व शुल्क व फीस हे वेळोवेळी लागू होऊ शकणा-या लागू कर, अधिभार, लेव्हीज, सरचार्जेस, उपकर ह्यांच्याव्यतिरिक्त आहेत.

2. मुख्य तथ्य विधान व त्याची परिशिष्टे अनुसूचीची ॲटॅचमेंट म्हणून दिली आहेत.

**कर्जांच्या वर्गीकरणाचा आधार आरबीआयच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पुढील पद्धतीने एसएमए आणि एनपीए प्रकार असा आहे.**

| वर्गीकरणाचे प्रकार | वर्गीकरणाचा आधार- मुद्दल किंवा व्याज पेमेंट किंवा पूर्णतः किंवा अंशतः बाकी असलेली अन्य कोणतीही रक्कम |
|---|---|
| एसएमए-0 | 30 दिवसांपर्यंत |
| एसएमए-1 | 30 दिवस ते 60 दिवस |
| एसएमए-2 | 60 दिवस ते 90 दिवस |
| एनपीए | 90 दिवसांपेक्षा जास्त |

एसएमए किंवा एनपीए हे वर्गीकरण संबंधित दिवशी दिवस संपतानाच्या प्रक्रियेचा भाग म्हणून केले जाते व एसएमए किंवा एनपीए वर्गीकरण दिनांक हा तो कॅलेंडर दिवस असेल ज्यासाठी कंपनीद्वारे दिवसाच्या शेवटची प्रक्रिया केली गेलेली असेल.

एनपीए म्हणून वर्गीकरण केल्या गेलेल्या कर्ज खात्यांना प्रमाणित संसाधन म्हणून फक्त तेव्हाच अपग्रेड केले जाईल जेव्हा मुद्दल व्याज आणि/किंवा अन्य रकमा कर्जदाराद्वारे संपूर्ण अदा केल्या जातील ("प्रमाणित संसाधन" शब्दाचा अर्थ असे कर्ज खाते जे एसएमए किंवा एनपीए म्हणून वर्गीकरण होणे गरजेचे नसलेले खाते, असा घेतला जाईल). एसएमए किंवा एनपीए वर्गीकरण हे कर्जदाराच्या पातळीवर केले जाते म्हणजे कर्जदाराची सर्व कर्ज खात्यांचे वर्गीकरण त्या कर्जासाठी लागू असलेल्या सर्वाधिक ओव्हरड्यु दिवसांच्या आधारे केले जाईल.

एसएमए किंवा एनपीए म्हणून कर्ज खात्यांच्या वर्गीकरणामध्ये काही बदल झाल्यास किंवा आरबीआयद्वारे एखादा नवीन प्रकार निश्चित केला गेल्यास त्यावर कंपनी आपोआप कार्यवाही करेल व तेच ग्राहकालाही लागू असेल.

**एसएमए/एनपीए वर्गीकरणाचे उदाहरण:** जर कर्ज खात्याचा ड्यु दिनांक 31 मार्च 2022 असेल व त्या दिवसाच्या शेवटची प्रक्रिया कंपनीद्वारे पूर्ण करेपर्यंत जर सर्व ड्युज मिळाले नाहीत, तर ओव्हरड्युचा दिनांक 31 मार्च 2022 असेल. जर कर्ज खाते ओव्हरड्युच राहिले तर 30 एप्रिल 2022 रोजीची दिवसाची प्रक्रिया संपल्यावर म्हणजेच सातत्याने ओव्हरड्यु असल्याचे 30 दिवस पूर्ण झाल्यावर त्या कर्ज खात्याचे वर्गीकरण एसएमए- 1 असे केले जाईल. त्यानुसार कर्ज खात्याच्या एसएमए- 1 वर्गीकरणाचा दिनांक 30 एप्रिल 2022 असेल.

तसेच, जर कर्ज खाते पुढेही ओव्हरड्यु राहिले तर 30 मे 2022 रोजी दिवसाची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर त्या कर्ज खात्याचे वर्गीकरण एसएमए- 2 म्हणून केले जाईल व ते पुढेही ओव्हरड्यु राहिले तर 29 जून 2022 रोजी दिवस संपल्यानंतरची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर त्याचे वर्गीकरण एनपीए म्हणून केले जाईल.

कृपया लक्षात घ्या की, एसएमए व एनपीए असेक् हात्याचे वर्गीकरण व हे उदाहरण हे कंपनीच्या सध्याच्या दिवशी एसएमए आणि एनपीए म्हणून कर्ज खात्याचे वर्गीकरण करण्याच्या वापरल्या जाणा-या प्रक्रियेची कर्जदाराला माहिती व्हावी म्हणून दिले गेले आहे. भारतीय रिजर्व बँकेच्या सूचनांनुसार/मार्गदर्शक निर्देशांनुसार ह्या प्रक्रियेत बदल होऊ शकतो.

स्वाक्षरी केली व सादर केले.

नाव दिलेल्या व्यक्तींनी

चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड

नाव दिलेल्या व्यक्तींनी स्वाक्षरी केली व सादर केले.

| | |
|---|---|
| अधिकृत स्वाक्षरीकर्ते | कर्जदाराचे नाव व स्वाक्षरी |
| स्वाक्षरी केली व सादर केले. | स्वाक्षरी केली व सादर केले. |
| नाव दिलेल्या व्यक्तींनी | नाव दिलेल्या व्यक्तींनी |
| सह कर्जदार 1 चे नाव व स्वाक्षरी | सह कर्जदार 2 चे नाव व स्वाक्षरी |
| स्वाक्षरी केली व सादर केले. | स्वाक्षरी केली व सादर केले. |

नाव दिलेल्या व्यक्तींनी

नाव दिलेल्या व्यक्तींनी

सह कर्जदार 3 चे नाव व स्वाक्षरी

सह कर्जदार 4 चे नाव व स्वाक्षरी

स्वाक्षरी केली व सादर केले.

स्वाक्षरी केली व सादर केले.

नाव दिलेल्या व्यक्तींनी

नाव दिलेल्या व्यक्तींनी

सह कर्जदार 5 चे नाव व स्वाक्षरी

गॅरेंटरचे नाव व स्वाक्षरी

**परतफेडीचे वेळापत्रक**

| इन्स्टॉल क्र. | ड्यु दिनांक | सुरूवातीची शिल्लक | इन्स्टॉलमेंट | मुद्दल | व्याज | प्रभावी दर (%) दिवस |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

* कृपया लक्षात घ्या की, इथे दिलेले परतफेडीचे वेळापत्रक हे तात्पुरते आहे व कर्ज वितरणाचा वास्तविक दिवस व प्रमाण ह्यानुसार ते बदलू शकते व कर्जदाराला सुधारित परतफेड वेळापत्रक लिखित स्वरूपात कळवले जाईल व ते ह्या कराराचा भाग आहे असे समजले जाईल.